आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १६ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २३०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 16 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-230 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# लोहा शहरात वानराचा हैदोस; वानराने घेतला पुन्हा एकाला चावा

आधुनिक केसरी

**लोहा :** शहरातील मानवी वस्तीत मागील कांहीं कालावधी पासून वानरांचा मुक्त संचार असून गत दोन महिन्यांत वानराच्या हल्यात साठ ते सत्तर नागरिक सापडले. रस्त्याने चालणाऱ्याच्या अंगावर पाठीमागून उडी मारणे, दुचाकी वरील स्वाराच्या अंगावर उडी मारणे असा प्रकार सुरू असून त्यामुळे अनेकजण जखमी झाले आता तर चक्क वानर दिसेल त्याला चावत असल्याने नागरिक भयभीत झाले असून दोन महिन्यांपासून वन विभाग सदर गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. अंगणात फेरफटका मारत असलेल्या तरुणावर सदर वानराने हल्ला चढवीत पायाची फेंडरी फोडून गंभीर जखमी केल्याची घटना दि. १४ एप्रिल रोजी रात्री आठ वाजता घडली.



तीव्र उन्हाळ्यामुळे जंगलातील जलसाठे कोरडेठाक पडले असून जंगलात वन्य प्राण्यांना खाद्य देखील मिळत नसल्यामुळे मागील जानेवारी-फेब्रुवारी महिन्यांपासून वानर जंगल भाग सोडून मानवी वस्ती मध्ये शिरकाव करत आहेत. पत्र्याच्या घरावर उडी मारणे, छतावर वाळण टाकलेले पापडी, शेवाई, चना, भुईमूग शेंगा खाऊन नासधूस करत आहेत. कुणी अडवण्यासाठी गेल्यास वानर त्यावर धावून जात असल्याने सर्वसामान्य नागरिक, महिला यांच्या मनात प्रचंड भीती निर्माण झाली असून नागरिक भयभीत झाले आहेत. मागील २० फेब्रुवारी रोजी इंदिरा नगर परिसरातील गुरुकृपा शाळे लगत राहणाऱ्या कुटुंबातील आठ वर्षीय बालकाला शरीरावर तीन ठिकाणी कडाडून चावा घेतल्याने सदरील मुलगा गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर सातत्याने अनेकांना सदर वानराने चावा घेतला तर कांहीं पादचारी, दुचाकीस्वार यांच्या अंगावर पाठीमागून उडी मारून त्यांना पाडले. त्यात अनेकजण गंभीर जखमी झाले. शहरातील बीडवई नगर भागातील आलोक अरुण मिसाळ हा तरुण दि. १४ रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास जेवण करून अंगणात शत पावली करत असताना अचानक वानर आले आणि डाव्या पायाच्या फेंडरीला कडाडून चावा घेवून रक्त बंबाळ केले. त्यास तत्काळ लोहा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करून प्राथमिक उपचारानंतर नांदेडला हलविले. घटनेची माहिती मिळाल्या नंतर वन विभागाचे उपवन संरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक ठाकुर, वनपरिक्षेत्र अधिकारी शिंदे, वनपरिमंडळ अधिकारी क्यादरवाड, वनरक्षक पी आर घुगे, वनसेवक नारायण शेवडीकर, नरसिंग बगाडे आदींनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला.
वानराच्या मर्कट लीलानी शहर वाशिय त्रस्त झाले असून वानर लहान मुलांसह मोठ्या व्यक्तीवर देखील हल्ला करत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्लेखोर वानररास पकडण्यासाठी वनविभागाकडून सापळा लावला असून सदर वानर उद्यापर्यंत सापळ्यात अडकले नसल्यास दोन दिवसात प्रशिक्षित वनविभागाचे कर्मचारी बोलावण्यात येणार असल्याचे वनरक्षक पी. आर. घुगे यांनी सांगितले.

# मोदी सरकारने शेतकऱ्यांना १८ टक्के जीएसटी लावून लुटले : नाना पटोले

## आदिवासींच्या जल, जंगल, जमिनीच्या रक्षणासाठी काँग्रेस कटिबद्ध

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली : काँग्रेस व इंडिया आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर आदिवासी, दलित, भटके, विमुक्त जातीच्या लोकांसाठी न्याय पत्रात दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील. वन हक्क कायद्याचे सर्व प्रलंबित दावे एका वर्षाच्या आत निकाली काढणे व नाकारलेल्या दाव्यांचे पुनरावलोकन ६ महिन्यांत केले जाणार आहे. जातनिहाय जनगणना करण्याचा संकल्प काँग्रेसच्या न्यायपत्रात असून बहुजनांच्या कल्याणासाठी काँग्रेसने विचार करुन जाहिरनामा बनवला आहे. भाजपा आदिवासींना वनवासी म्हणून अपमानीत करून त्यांना न्याय हक्कापासून वंचित ठेवते परंतु आदिवासींच्या जल, जंगल आणि जमीनच्या रक्षणासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले आहे.**

गडचिरोली-चिमूर मतदारसंघाचे काँग्रेस इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांच्या प्रचारार्थ देसाईगंज तालुक्यातील सभेत ते बोलत होते. नाना पटोले पुढे म्हणाले की, गडचिरोलीमध्ये नैसर्गिक संपदा मोठ्या प्रमाणात आहे पण ही नैसर्गिक संपदा भाजपा सरकार पोलिसांच्या मदतीने लुटत आहे, सुर्यागडमधील सोने लुटले जात आहे, वनसंपदा तोडून टाकत आहेत. लोकांवर खोटे गुन्हे दाखल करतात, नैसर्गिक संपत्तीची ही लूट थांबवायची आहे. काँग्रेसची सत्ता आली की ही लूट थांबवून गडचिरोलीला आर्थिक राजधानी बनवू.
नरेंद्र मोदी शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये देतात पण खताच्या किंमतीमध्ये हजार रुपयाने वाढ झाली आहे, ट्रॅक्टरला डिझेल लागते तेही महाग केले, बियाणे, औषधे याच्याही किमती वाढवल्या आणि शेती साहित्यावर १८ टक्के जीसटी लावून शेतकऱ्यांना लुटले जात आहे. श्रीमंत व सामान्य शेतकरी दोघांनाही १८ टक्केच जीएसटी लावला जातो. मोदी सरकारच्या १० वर्षांच्या सरकारमध्ये महागाई चारपटीने वाढली, १५ लाख बँक खात्यात जमा करणार होते ते दिले नाहीत. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवले नाही, मग कशाला पुन्हा नरेंद्र मोदींना मतदान करायचे? असा प्रश्न विचारून भाजपा गरिबांना ५ किलो




मोफत धान्य देऊन तुमचा हक्काचा रोजगार हिरावून घेत आहे व सर्वसामान्य जनतेला गुलाम बनवत आहे, असे पटोले म्हणाले. काँग्रेसच्या जाहिरनाम्यात सर्व जाती धर्मांचा विचार करुन त्यांना न्याय देणारे न्याय पत्र बनवले आहे. राहुल गांधी यांनी पदयात्रेच्या माध्यमातून देश पिंजून काढला. शेतकरी, कामगार, रोजंदारी करणारे, आदिवासी, ओबीसी दलित, महिला, तरुणांचे दुःख पाहिले व त्यातून या ५ न्याय व २५ गॅरंटी दिल्या आहेत. काँग्रेसने दिलेल्या गॅरंटी या एका व्यक्तीच्या नाहीत तर पक्षाच्या आहेत व सत्तेवर येताच त्याची तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासनही नाना पटोले यांनी दिले.
या प्रचार सभेला अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आमदार वजाहत मिर्झा व महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते.

# तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारतीय संघ विश्वचषकाचा सामना हरला : उद्धव ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भंडाऱ्यातील सभेत बोलताना अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांच्या पुत्रप्रेमामुळे शिवसेना पक्ष फुटला, असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या टीकेला उद्धव ठाकरे यांनी जशास तसे प्रत्युत्तर दिले आहे. तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारतीय क्रिकेट संघ विश्वचषक स्पर्धेत अंतिम सामना हारला, असा टोला सोमवारी उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांना लगावला.
अमित शाह यांनी भंडाऱ्यातील सभेत म्हटले होते की, उद्धव ठाकरे आणि शरद पवार सातत्याने भाजपने आमचा पक्ष फोडला, असे म्हणत असतात. पण मला महाराष्ट्रातील जनतेला एक गोष्ट स्पष्ट सांगायची आहे की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष भाजपने फोडले नाहीत. उद्धव ठाकरे यांचे पुत्रप्रेम आणि शरद पवारांच्या मुलीवरील प्रेमामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी हे पक्ष फुटले, असे अमित शाह यांनी म्हटले होते. याविषयी उद्धव ठाकरे यांना आजच्या पत्रकार परिषदेत विचारणा करण्यात आली. तेव्हा उद्धव ठाकरे यांनी मिश्कील शैलीत अमित शाह यांना टोला लगावला. त्यांनी म्हटले की, मला अमित शाह यांना सांगायचे आहे की, तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारत अंतिम सामना हरला आहे. मी तसे पुत्रप्रेम दाखवले नाही, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. अमित शाह यांचे पुत्र जय शहा हे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष आहेत. गेल्यावर्षी भारतात एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा अंतिम सामना शक्यतो मुंबई, दिल्ली किंवा कोलकाता येथील मैदानांवर होतो. मात्र, ही परंपरा मोडीत काढत बीसीसीआयने वर्ल्डकपच्या अंतिम सामन्याचे आयोजन गुजरातमधील नरेंद्र मोदी मैदानावर केले होते. या निर्णयावर अनेकांना प्रश्नही उपस्थित केले होते. या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना अप्रत्यक्षपणे अमित शाह यांचा चेला म्हणून संबोधले. त्यांनी म्हटले की, अमित शाह यांचं पक्षातील स्थान नक्की काय आहे? भाजपमध्ये राष्ट्रीय अध्यक्षांना किती अधिकार असतात, हे सर्वांना माहिती आहे.


# डॉ. बाबासाहेबांच्या अनुयायांनी घडवले माणुसकीचे दर्शन

## गावात दुःखद घटना घडल्याने भीमजयंतीचा कार्यक्रम रद्द; सामाजिक एकतेचा दिला संदेश

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. बाळासाहेब बोराडे

श्रीक्षेत्र राजूर : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशभर मोठ्या उत्सवात साजरी केली जाते. या दिवशी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले जाते. भोकरदन तालुक्यातील राजुर येथेही दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी 14 एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु राजुर येथील प्रतिष्ठित व्यापारी गणेशराव पुंगळे (65)यांचे अपघाती निधन झाल्याची वार्ता कळताच या दुःखद घटनेमुळे भीम जयंतीनिमित्त आयोजित सर्व कार्यक्रम रद्द करून पुढे ढकलण्यात आल्याचे उत्सव समितीने जाहीर केले.एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा संदेश अनेक महापुरुषांनी दिला आहे परंतु त्याचा प्रत्यय या ठिकाणी आला.गावपातळीवर एकोपा आणि सामाजिक सलोखा जोपासण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले. गावात घडलेल्या दुःखद घटनेबद्दल सहानुभूती दाखवत बाबासाहेबांच्या अनुयायांनी माणुसकीचे दर्शन घडविले. या निर्णयाचे ग्रामस्थांकडून तेवढ्याच मोठ्या मनाने स्वागत केले जात आहे.
सविस्तर माहिती असे की राजुर येथील प्रतिष्ठित व्यापारी गणेशराव विठ्ठलराव पुंगळे ( 65 ) हे 10 एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास पायी चालत असताना दुचाकीच्या धडकेने डोक्याला मार लागून जबर जखमी झाले होते. उपचारासाठी त्यांना तात्काळ जालना येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु येथेही त्यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत नसल्याने गणेशराव पुंगळे यांना छत्रपती संभाजीनगर येथील मल्टीस्पेशलिस्ट हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले.या ठिकाणी त्यांच्या प्रकृतीत सुधारण्याची सर्वांना अशा होती.परंतु 14 एप्रिल रोजी उपचार सुरू असतानाच त्यांची तब्येत अधिकच खालावत चालली होती. डॉक्टर प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते परंतु त्यांच्या प्रयत्नांना पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नव्हता. शेवटी उपचारादरम्यान 14 एप्रिल रोजी गणेशराव पुंगळे यांचा मृत्यू झाला. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी राजूर येथे 14 एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जय्यत तयारी सुरू झाली होती. सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले होते.मुख्य कार्यक्रम मात्र सायंकाळी होता. यामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसेच गावातून मिरवणूक काढण्यात येणार होती. परंतु गणेशराव पुंगळे यांच्या निधनाची वार्ता कळताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे पदाधिकारी,सदस्य आणि समाज बांधवांनी तात्काळ निर्णय घेऊन 14 एप्रिल रोजी होणारे सर्व कार्यक्रम रद्द करून पुढे ढकलण्यात आल्याचे जाहीर केले. 19 एप्रिल रोजी दरवर्षीप्रमाणे भीम जयंती साजरी होणार असल्याचे उत्सव समितीच्या वतीने सांगण्यात आले. गावात घडलेल्या दुःखद घटनेबद्दल सहानुभूती दाखवत डॉ.बाबासाहेबांच्या अनुयायांनी माणुसकीचे दर्शन घडविल्या बद्दल ग्रामस्थांकडून या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. तसेच सर्व स्तरातून त्यांचे कौतुकही होत आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# फिटे अंधाराचे जाळे


आधुनिक केसरी

पण करमरकर कुटुंबीयांनी अथक प्रयत्नांनी त्या साध्य केल्या. मला त्यांना भगीरथाचे वंशज म्हणावेसे वाटते. भगीरथाने अथक प्रयत्न केले. स्वर्गातील गंगा पृथ्वीवर आणली. म्हणूनच कोणी प्रयत्नांची पराकाष्ठा केली की आपण त्याला ' भगीरथ प्रयत्न ' केले असे म्हणतो. या अर्थाने करमरकर हे भगीरथाचे वंशज आहेत. ' फिटे अंधाराचे जाळे ' वाचताना आपला प्रवास वल्लरीबरोबर होत असतो. जसजशी तिची प्रगती होते, तसतसे आपणही त्याचे साक्षीदार होत जातो. हे पुस्तक भाऊंनी ( भालचंद्र करमरकर ) इतके सुंदर लिहिले आहे की वल्लरीची जीवनगाथा जणू जिवंत होऊन आपल्यापुढे उलगडते. ती तीनचाकी सायकल चालवायला शिकते, बुद्धिबळ शिकते तेव्हा तिच्या पालकांना होणारा आनंद आपल्यालाही होतो. ती वाचायला शिकते, शाळेत जाते, परीक्षा देते, लुनावर बसायला शिकते, संगणकावर लिहायला शिकते या सगळ्या प्रगतीच्या आनंदाचे साक्षीदार हे पुस्तक वाचताना आपण होत जातो. तिला परीक्षेसाठी रायटर मिळवताना भाऊंना करावी लागणारी कसरत त्यांच्या सहनशक्तीचेही परीक्षा घेणारी असते. पण त्यात जेव्हा ते यशस्वी होतात, तेव्हा त्यांच्याइतकाच आनंद आपल्याला होत जातो. आज वल्लरी स्वतः लिहू शकते, गाणे म्हणू शकते, कॅसिओ वाजवते. जवळपास सगळी मराठी, हिंदी गाणी, कविता तिला तोंडपाठ आहेत. गाणे आणि कवितांचा वल्लरी म्हणजे जणू एनसायक्लोपीडिया. सर्वच दृष्टीने ' फिटे अंधाराचे जाळे ' हे पुस्तक म्हणजे जणू एक लखलखते झुंबर आहे. त्यात प्रयत्नांचे सौंदर्य, परिश्रमांची गाथा, आणि जिद्दीचा प्रवास आहे. वल्लरीसारखी मुले इतरही पालकांना असतात. कितीतरी मुलांना जन्मजात अपंगत्व आलेले असते. ते त्या मुलांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करीत नाहीत असे नाही. पण शेवटी ते हताश होतात, प्रयत्न सोडून देतात. दुसऱ्या अपत्यासाठी प्रयत्न करतात.

ज्या मुलांना दुर्दैवाने वल्लरीच्या मात्यापित्यांसारखे आईवडील लाभत नाहीत, त्यांची अवस्था फार वाईट होते. अशा कळ्या बहुधा फुलण्याआधीच गळून पडतात.



## हितगुज




पुष्प ३९वे

### गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### संतांचा समर्थसंदेश

अध्यात्म जीवनाचे रक्षाकवच आहे, त्यावाचून जगणे म्हणजे संधिसाधू बनून स्वार्थाच्या लपलपत्या जिव्हांनी पाय चाटणाऱ्या कोल्ह्याकुत्र्याचे जगणे आहे. सर्वजण नक्कीच ते धिक्कारतील. ईश्वरावर श्रद्धा नसेल तर उत्तम विचार, तत्त्वज्ञान फक्त शाब्दिक फुलोरे बनतील. ते निव्वळ पोथी-पांडित्य राहील; ज्याचा व्यक्ती, समाज यांना काही उपयोग नाही. त्यातून वैचारिक गोंधळ मात्र वाढेल. कारण अनुभूती व श्रद्धा नसताना शब्दांच्या, वाक्यांच्या मनाला येतील तशा व्याख्या केल्या जातील. ज्या ज्या वेळेस अशी वैचारिक अराजकता आली. त्यातून हताशता, दैन्य, परावलंबिता, दुबळेपणा जोर धरू लागला. समाजाला 'दे माय धरणी ठाय' झाले, त्या त्या वेळेस संतांनी अध्यात्माला सामाजिक चळवळींचे स्वरुप प्राप्त करून देऊन सांस्कृतिक पुनरुज्जीवन व मानव उन्नतीचे ध्वज फडकावले आहेत. संतांच्या कर्तृत्वातून, संदेशातून अध्यात्म समजून घेणे, हा योग्य मार्ग होय. संतांनी मनुष्यत्वाच्या सबलतेसाठी, समाधानासाठी, सुरक्षिततेसाठी ईश्वराविषयीची श्रद्धा, आस्था मजबूत केली. प्रत्येक माणसामध्ये भगवंताचा भरोसा, विश्वास संपादित केला. त्याच्या जगण्याच्या प्रेरणा ईश्वराशी जोडल्या. स्वतःला प्रतिक्षण ईश्वराबरोबर अनुभवणे, ही फार कठीण अशी उत्क्रांती आहे. ही मानसिक उत्क्रांती, मानसिक स्थिर बैठकीतून साध्य होते. त्यातून अंतर्यामी शुद्धता वाढीस लागते. प्रत्येक भावना, विचार, प्रत्येक वचन, कर्म, प्रत्येक आस्वाद, त्याग ईश्वरीय जाणीवेतून प्रकट होऊ लागला की साधारण माणूस 'महात्मा' बनतो.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४



## आनंदी पहाट

# विवाह हा समरसतेचा समाजमान्य सहप्रवास

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

विवाहाच्या नंतरच्या अवघ्या काही कालावधीतच सामाजिक बांधिलकीचे भान दोन्ही कुटुंबांमध्ये शिल्लक राहिले नसल्याचे दिसून येते. एकमेकांवर कुरघोडीचे प्रकार, आर्थिक पातळीवर चढाओढ, हेवेदावे सुरु झाल्याचे दिसू लागते. नवविवाहित उभयतांना देखील विवाह हे एकप्रकारे बंधन वाटायला लागते. परस्परविरोधी वक्तव्ये केली जायला लागतात. अलीकडच्या काही काळात अशा प्रकारच्या घटना अनेकांच्या बाबतीत घडल्याचे समजते. मग त्यांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, वैचारिक कुवत काम करणेच बंद होत जाते. विवाहपूर्व होत असलेल्या संवादांची जागा वादाने घेतलेली असते. शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या स्वतंत्र वातावरणात वाढलेल्या दोन घराण्यांतील भिन्नलिंगी व्यक्ती एकत्र येऊन त्यांनी जन्मभर एकत्र राहण्याचा विलक्षण प्रयोग समाजाच्या साक्षीने आणि विवाहाच्या रूपाने केला जात असतो. आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे, आपले सामाजिक स्थान. ह्या सामाजिक स्थानाचा संबंध थेट आपल्या सामाजिक बांधिलकीशी असतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ- सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, सामाजिक कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपल्या सामाजिक बांधिलकीचे नाते असते.



आधुनिक केसरी

## मस्तक चरणी | विठ्ठलाच्या ||

होता तुझी कृपा | आत्माराम जागे ||
मुका बोलु लागे | हरिपाठ ||१||
पांगळ्याशी पाय | देई माझ्या बापा ||
दावी मार्ग सोपा | आनंदाचा ||२||
बहिऱ्याशी देई | श्रवण किमया ||
तेणे ऐकावया | हरिकथा ||३||
आंधळ्यास दावी | मोक्षाची पंढरी ||
चेतवी अंतरी | ज्ञानज्योत ||४||
कृपावंत संत | मुढ झाला ज्ञानी ||
मस्तक चरणी | विठ्ठलाच्या ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पूरण ब्रह्म प्रकाश में,
जड़ तम होय अभाव ।
जिवन्मुक्त योगी भया, मिटा त्रिगुण
जग भाव ।।६२।।(स्वर्वेद पंचम मण्डल
एकादश अध्याय) ०५/११/६२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
पूर्णब्रह्माचा प्रकाश उदय झाल्यावर जड़-अंधःकार दूर होतो आणि जगताचे त्रिगुण भाव (सत्त्व, रज, तम) नष्ट होतात; त्या अवस्थेत जीवन्मुक्त योग्याचे पद प्राप्त होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

या समाजामध्ये समर्थांनी संपूर्ण विश्व मनाचे वर्णन केले आहे. जालना जिल्ह्यातील जांब गावचा एक खोडकर व्रात्य मुलगा वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी आपल्या आईला म्हणतो. चिंता करितो मी विश्वाचि संत साहित्याचा अभ्यास करत असताना एक गोष्ट लक्षात आल्यावाचून राहत नाही. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज आणि रामदासस्वामी हे सर्व जण संत महात्मे होऊन गेले संतांनी स्वतः ला काही मागितले नाही तर त्यांनी विश्व मनाचा विचार केला. त्यात पुढे बाल शिवबा वर पण जिजाऊने देशप्रेमाचेच धडे शिकवले अशी ही थोर मंडळी. सबंध दृष्य विश्वाला व्यापून रहाणारी व धारण करणारी एक मोठी जाणीव आहे तिला हिरण्यगर्भ किंवा ओंकार म्हणतात.

# नामाविषयी शुद्ध भाव आवश्यक

आधुनिक केसरी



ईश्वर सर्वांचा उत्पन्नकर्ता आहे, रक्षणकर्ता आहे, तसेच संहारकर्ताही आहे. परंतु तरी त्याला न्यायी आणि प्रेमी म्हणतातच, कारण तो निःस्वार्थी आहे. म्हणजे प्रेम हे निःस्वार्थातच असते. आपल्याला खरे म्हटले म्हणजे आपला स्वार्थच नडतो. आपला स्वार्थ प्रेमाच्या आड येतो. आपले विषय ईश्वर-प्रेमात व्यत्यय आणतात. ज्या ज्या गोष्टी या प्रेमाच्या आड येतात त्यांचा त्याग नको का करायला ? तेव्हा विषयांची आसक्ती, त्यांच्यावरचे प्रेम, नाहीसे झाले पाहिजे. आपण ईश्वराचे, संतांचे झाले पाहिजे. त्याशिवाय आपल्याला कशाचीही गरज वाटता कामा नये. एकाच मातीचा जसा गणपती, बाहुले किंवा मडके होते, त्याप्रमाणे ईश्वरही आपल्या भावनेप्रमाणे होतो. म्हणूनच आपला भाव नेहमी शुद्ध आणि निःस्वार्थी असावा. मुळाशी पाणी घातले की झाड वाढते, पण आपण मुळापर्यंत जातच नाही. तेव्हा, भाव शुद्ध कसा होईल ते पाहावे. उदाहरणार्थ, एकादशीच्या दिवशी उपवास करायचा एवढेच आपल्याला ठाऊक असते. पण एक गृहस्थ एकादशीला भगवंताचे नामस्मरण करायचे सोडून बारा वाजेपर्यंत अंघोळ न करता अंगण, मोरी झाडत बसला ! असे आमुचे चुकते. थोडक्यात म्हणजे, आपल्याला मुळात काय पाहिजे हेच कळत नाही. कावीळ झाली म्हणजे डोळ्याला खरे रूप कसे कळणार ? म्हणून, ज्याचे डोळे साफ आहेत तो सांगेल त्याप्रमाणे वागावे. याकरिता गुरु-आज्ञा प्रमाण मानून आपण वागत जावे. नाम श्रद्धेने आणि शुद्ध भावाने घ्यावे म्हणजे मनात शंका येत नाहीत. या भगवंताच्या नामाची गोडी एकदा लागली म्हणजे भगवंत नाही आपल्याला सोडीत. नामाशिवाय दुसरे सत्यच नाही अशी दृढ भावना झाली पाहिजे. जितकी देहबुद्धी अधिक तितके नाम अधिक घेतले पाहिजे. आज इतके दिवस आपण विषयाचे चिंतन केले, त्याने आपल्या हातात काय आले ? नामासारखे सोपे साधन नाही. प्रापंचिक लोक असे म्हणतात की, "विषयाचा अनुभव तात्काळ येतो, पण भगवंताचा अनुभव हा अनुमानाचा आणि श्रद्धेचा आहे." हे त्यांचे म्हणणे मला पटते. प्रापंचिक लोक प्रपंच सोडीत नाहीत याचे मला नवल वाटत नाही. पण ते सुख चिरकाल टिकणारे आहे ही समजूत करून घेऊन त्यामध्ये रमतात, याचे मला वाईट वाटते. मी असे म्हणतो की, तुमच्या अनुभवाप्रमाणे जे खरे आहे, तेवढेच तुम्ही खरे माना. विषयाच्या ध्यासापासून सुख नाही असे वाटू लागले म्हणजे नामाची गोडी येईल. आपल्या देहावर आपली सत्ता नाही, आपल्या पैशावर आपली सत्ता नाही, आपल्या माणसांवर आपली सत्ता नाही. म्हणून आपले कर्तव्य तेवढे करावे, आणि ते करीत असताना आपले मन दुश्चित्त होऊ देऊ नये. **४९. भगवत्प्राप्ती हे आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून आपण नेहमी त्याच्याभोवती फिरत असावे; म्हणजेच त्याच्या अनुसंधानात असावे.**

## निरूपण

आधुनिक केसरी

कोणी येकें घातलें पाश । या नांव आदिभूतिक ॥ १७॥
अवचिता सेर लागला । नेणो बिबवा चिडला ।
प्राणी धुरें जाजावला । या नांव आदिभूतिक ॥ १८॥
इंगळावरी पाय पडे । शिळेखालें हात सांपडे ।
धावतां आडखुळे पडे । या नांव आदिभूतिक ॥ १९॥
वापी कूप सरोवर । गर्ता कडा नदीतीर ।
आवचितें पडे शरीर । या नांव आदिभूतिक ॥ २०॥
दुर्गाखालें कोंसळती । झाडावरून पडती ।
तेणें दुह्खें आक्रंदती । या नांव आदिभूतिक ॥ २१॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १६ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# मुनगंटीवार चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचा 'मेकओव्हर' करतील

## उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी

**वणी :** संपूर्ण विश्वाने नेता मानलेले नरेंद्रजी मोदी यांचे नेतृत्व स्वीकारणे किंवा राहुल गांधींच्या नेतृत्वात 26 पक्षांच्या इंडिया आघाडीला देशाचे तुकडे करू देणे, असे दोनच पर्याय आता आपल्याकडे शिल्लक राहिले आहेत. पहिला पर्याय प्रगतीकडे नेणारा तर दुसरा अधोगतीकडे नेणारा आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्या विकासाचा धडाका बघता ते खासदार झाल्यास चंद्रपुरचा 'मेकओव्हर' करतील, अशी खात्री आहे. मतदारांनी त्यांना कौल दिल्यास ते विजयी होतील आणि काँग्रेसला धक्का बसेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस म्हणाले. यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील टिळक चौक, शासकीय मैदानात आयोजित सभेत ते बोलत होते. ना. श्री. मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मतदारांना साद घातली. यावेळी भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ, आमदार डॉ. संदीप धुर्वे, आमदार डॉ. अशोक उईके आमदार संजय रेड्डी बोदकुरवार, भाजपचे जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, मनसेचे राजू उंबरकर, रवी बेलूरकर, विनोद मोहितकर यांच्यासह भाजपा-शिवसेना रिपाइं, रासप महायुतीचे अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या आमदारकीच्या काळात, मंत्रिपदाच्या काळात चंद्रपूरचा कायापालट केला. विकास कामांसाठी मुनगंटीवार सतत आग्रही असतात. प्रत्येकाने किमान एकदा तरी चंद्रपूरचे बदलेले रूप पहावे. श्री. सुधीर मुनगंटीवार लोकसभेत खासदार म्हणून गेल्यास काय करू शकतील, याची त्यावरून कल्पना येते, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आयुष्यात आपण कधीच बनवाबनवीचे राजकारण केले नाही. राजकारणात प्रवेश केला त्या दिवसापासून आपण मतदारसंघाच्या तसेच जिल्ह्याच्या प्रगतीचा विचार केला. मतदारांना जो शब्द दिला, तो पूर्ण केला. आतापर्यंत केलेल्या प्रत्येक विकास कामाचा पुरावा आपल्याकडे आहे. त्यामुळे लोकसभा निवडणूक जिंकताच वणी विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करून दाखवू, असा शब्द राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

यावेळी मुनगंटीवार पुढे म्हणाले, की व्यक्तीला साधे मोबाइल सीमकार्ड घ्यायचे असेल, तर आपण चांगली सेवा देणारी कंपनी निवडतो. मग देश चालवायचा प्रश्न असेल तेव्हा विकास करणारी पार्टीच निवडली पाहिजे. देशाचा पंतप्रधान कोण होणार, हे लहान बालकाला विचारले तरी तो नरेंद्रजी मोदीजी हेच नाव घेईल. देशात जर मोदींचे सरकार येणार असेल, तर अन्य पक्षाच्या उमेदवारांकडे बघायचेच कशाला? गेल्या दहा वर्षात नरेंद्रजी मोदी यांनी देशाचा कायापालट केला. देशाचा परिपूर्ण विकास करायचा असेल तर भाग्यरेषा नसलेला काँग्रेसचा तुटका पंजा मतदारांनी विसरावा. देशात आणि राज्यात महायुतीची सत्ता येणार आहे. अशात केवळ जातीच्या आधारावर किंवा भावनिक आधारावर मतदार बळी पडले तर मतदारसंघ मात्र माघारेल असे मुनगंटीवार म्हणाले. काँग्रेस कायम सत्तेसाठी हपापली आहे. काँग्रेसने आजपर्यंत देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या अनेक शहिदांचा अपमान केला आहे. केवळ जातीचे



**आता आम्ही दोघे आहोत !** : आमदार संजय रेड्डी यांना उद्देशून देवेंद्रजी फडणवीस म्हणाले, तुम्ही जेव्हा निधी मागितला आम्ही दिला. चिंता करू नका. पिण्याच्या पाण्याची वणीची योजना जवळपास मंजूर करून ठेवली आहे. आचारसंहिता झाली की त्यालाही निधी मिळेल. संजय रेड्डी तुम्ही एकटे नाहीत. आता एकीकडे श्री. सुधीर मुनगंटीवार आहेत आणि दुसरीकडे मी आहे. केंद्र आणि राज्य सरकार असा दोन्हींचा निधी कमी पडणार नाही ही ग्वाही देतो. कार्यक्रमादरम्यान धनोजे कुणबी परिवर्तन महिला संस्थेच्या वणी अध्यक्ष संध्याताई नादेकर, रुंदाताई नागरकर आदींनी भाजपमध्ये प्रवेश घेतला. पक्षाने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

राजकारण केले आहे. अशात काँग्रेसला मतदान कराल तर भविष्यातील पिढी आपल्याला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही. जात ही घराच्या उंबरठ्याच्या आत असते. डॉक्टर रुग्णाची जात पाहून उपचार करीत नाही. शिक्षक विद्यार्थ्यांची जात पाहून शिक्षण देत नाही. हवा, पाणी, निसर्ग कोणाला जात विचारत नाही. त्यामुळे जातीच्या आधारावर मतदान करू नका, असे ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले. काँग्रेसच्या खासदार, आमदारांची दहा वर्ष सत्ता होती. या दहा वर्षांत त्यांनी कोणती विकासकामे केली ? याची यादी सादर करावी. आपण केलेल्या कामाची यादीच नव्हे तर प्रत्यक्ष पुरावा आपण सादर करीत आहोत. काँग्रेसने मतदारसंघात केलेल्या 21 मोठ्या कामांची यादी दिली तरी पुरेसे आहे. काँग्रेसने विकास कामेच केली नसल्याने आता जातीचा आधारावर भावनिक साद घालावी लागत आहे, असा घणाघात मुनगंटीवार यांनी केला.

# भाजपा पंतप्रधानांचा प्रणाम घरोघरी पोहोचवणार : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी

**चंद्रपूर :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील लोकसभेच्या प्रचाराची सुरुवात चंद्रपूर मधून केली . चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्राचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी ते चंद्रपूर येथे आले होते . यावेळी बोलताना त्यांनी माझा प्रणाम घरोघरी पोहोचवा असे आवाहन केले होते . पंतप्रधान मोदी यांच्या या आव्हानाला प्रतिसाद देत मुनगंटीवार यांनी नरेंद्र मोदी यांचा प्रणाम घरोघरी पोहोचविण्यासाठी संकल्प



केला असून 16 एप्रिल रोजी भाजपाचे सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी पंतप्रधानांचा प्रणाम घरोघरी पोचविणार आहेत.

यासोबतच सुधीर मुनगंटीवार यांचा वचननामा सुद्धा ते घरोघरी पोहोचवणार आहेत . सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या वचननाम्यामध्ये कृषी व वन , रस्ते रेल्वे व पायाभूत सुविधा , उद्योग व रोजगार , ऐतिहासिक वारसा , सांस्कृतिक क्षेत्र तसेच सेवा आणि सहयोग अशा विविध मुद्द्यांवर आपला वाचनामा तयार केला असून यात विविध मुद्द्यांचा अंतर्भाव केलेला आहे .

वर्धा नदीवर बंधारे बांधून सिंचनाची व्यवस्था करणे, जिवती येथील वन जमिनीचा प्रश्न निकाली काढणे, कोल बेरिंग ॲक्ट शेतकरी व संस्थानिकांच्या हिताचा कसा होईल यासाठी त्यात बदल करण्याचा प्रयत्न करणार, मतदार संघात आवश्यक त्या ठिकाणी रेल्वे ROB आणि अंडरपास करणार, मूर्ती विमानतळ पूर्ण करणार, चंद्रपूर शहरातून आऊटर रिंग रोड करणार, नागपूर चंद्रपूर मेट्रो पुढे राजुरा पर्यंत वाढविणार, नागपूर हैदराबाद वंदे भारत एक्सप्रेस सुरू करणार, मतदार संघात नवीन उद्योगांची निर्मिती करणार, आदिवासींच्या सांस्कृतिक वारसांच्या जतन करणार, फिरते जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना सेवा देणार असे वचन सुधीर मुनगंटीवार यांच्या वचननाम्यात देण्यात आलेले आहे. हा वचननामा आणि पंतप्रधान मोदींनी आपल्या सभेत केलेल्या आवाहनानुसार पंतप्रधान मोदींचा प्रणाम घेऊन कार्यकर्ते एका दिवसात संपूर्ण लोकसभा क्षेत्रात घरोघरी पोहोचणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. पत्रकार परिषदेला भाजपा लोकसभा प्रमुख प्रमोद कडू, राहुल पावडे, महिला आघाडीच्या सविता कांबळे आदींची उपस्थिती होती.

# गोलमाल है भाई सब गोलमाल है

आधुनिक केसरी

महाराष्ट्रातील सगळ्यात हॉट सीट म्हणून ज्या सीट कडे पाहिलं जातंय अशी चंद्रपूर वणी आर्णी निर्वाचन क्षेत्राच्या लोकसभेचे मतदान पहिल्या टप्प्यात 19 एप्रिल रोजी होत आहे . मतदानाला आता अवघे चार दिवस बाकी आहेत . आणि या अंतिम टप्प्यातल्या मतदानामध्ये मात्र काँग्रेस भाजप अशी थेट लढत असली तरी अंतर्गत बरंच काही चाणक्य नीती द्वारे चालत असून पब्लिकला मात्र गोलमाल है सब भाई गोलमाल है " असंच काहीच चित्र दिसते आहे. महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्यमंत्री ज्यांच्याकडे विविध मंत्रिपदांचा आणि राजकीय कारकीर्दीचा बराच मोठा अनुभव आहे असे सुधीर मुनगंटीवार आणि काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांच्यामध्ये थेट लढत दिसत आहे.
मी रडणारी नाही तर लढणारी स्त्री आहे असं म्हणत कमरेचा पदर खोचून खमकेदार पणाने निवडणुकीला प्रतिभा धानोरकर या समोर जात आहेत .परंतु , त्यांना लढण्यासाठी आवश्यक असलेल पक्षांतर्गत बळ मात्र मिळताना दिसत नाही. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार हे फक्त एका जाहीर सभेमध्ये धानोरकर यांच्या सोबत स्टेजवर दिसले . परंतु ,नंतर मात्र या लोकसभा निर्वाचन क्षेत्रात त्यांनी येणे टाळले . यासोबतच त्यांची सुकन्या शिवानी वडेट्टीवार या सुद्धा निवडणूक प्रचारापासून कोसो दूर राहिल्या आहेत . शिवाय कोणत्याही स्टार प्रचारकाची एकही मोठी सभा धानोरकरांनी अजूनपर्यंत आयोजित केलेली नाही. नाही म्हणायला काल दिनांक 14 एप्रिल ला कन्हैया कुमार यांची एक सभा झाली. परंतु काँग्रेसच्या स्टार प्रचारक असलेल्या प्रियंका गांधी यांची मात्र त्यांना सभा मिळालेली नाही. तेलगू भाषिक मतांवर डोळा ठेऊन आयोजित केलेली मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांची सभा रद्द झाली. त्यामुळे फक्त जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे, शहर अध्यक्ष रितेश तिवारी यांच्या सहकार्याने प्रतिभा धानोरकर या आता एकतर्फी स्वतः स्टार प्रचारक होत अवघा लोकसभा मतदारसंघ पिंजून काढताना दिसत आहेत.
दुसऱ्या बाजूला भारतीय जनता पार्टी व महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी मात्र सुरुवातीपासूनच प्रचारामध्ये आघाडी घेत नितीन गडकरी , देवेंद्र फडणवीस आणि थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी अशा दिग्गजांच्या सभा आपल्या मतदारसंघात खेचून आणल्या. शिवाय रविना टंडन, सुनील शेट्टी अशा बॉलीवूडच्या सिनेतारकांचे भव्य रोड शो करण्यात देखील त्यांना यश मिळाले. त्यांच्या मदतीला गेल्या तीन दिवसापासून चंद्रपूरमध्ये महिला आघाडीच्या अध्यक्ष चित्रा वाघ या सुद्धा तळ ठोकून बसल्या आहेत . हे सगळं होत असलं तरीही , निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात ज्या पद्धतीने प्रचार रंगायला हवा तो प्रचार मात्र रंगताना या चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा क्षेत्रात दिसत नाही अशी चर्चा आता नागरिकांमध्ये रंगू लागली आहे .

वंचित बहुजन आघाडीने राजेश बेले या तेली समाजाच्या उमेदवाराला उमेदवारी देत थेट लढतीमध्ये मत खाण्यासाठी उभे केले असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे . राजेश बेले यांनी प्रकाश आंबेडकर यांची सभा खेचून आणत चांगलीच गर्दी जमवली होती . परंतु , याचा फायदा नेमका कोणाला मिळेल ? हे आत्ताच सांगणे कठीण आहे . दुसऱ्या बाजूला ओबीसी बहुल असलेल्या या लोकसभा मतदारसंघांमध्ये तेली समाजाच्या मतांमध्ये मोठ्या प्रमाणात फूट पडलेली दिसते आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा उजवा हात व खंदे समर्थक म्हणून ओळखले जाणारे प्रकाश देवतळे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला .तर काँग्रेस सेवादल चे अध्यक्ष सूर्यकांत खणके यांनी सत्कार समारंभाच्या निमित्ताने मातोश्री सभागृहामध्ये तेली समाज बांधवांची सभा घेत ऐनवेळी प्रतिभा धानोरकर यांना पाठिंबा जाहीर केला . त्यामुळे त्यांच्या समोरच तेली समाजामध्ये त्याच सभागृहामध्ये प्रचंड गोंधळ निर्माण झाला . त्यांच्यावर एकतर्फी पाठिंबा घोषित केल्याबद्दल समाजाच्या रोषाला समोर जावे लागत आहे . दुसऱ्या बाजूला तेली समाजाचे उमेदवार राजेश बेले हे आपल्या सोबत अवघा तेली समाज माझ्या बाजूने आहे हे सांगत आहेत. सूर्यकांत खनके यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे ते समाज माध्यमांवर त्यांच्याच समाज बांधवांकडून ट्रोल केल्या जात आहेत . त्यामुळे तेली समाजामध्ये मोठ्या प्रमाणात फूट पडली असून काँग्रेसला ओबीसी समाजाची ही मते किती प्रमाणात मिळतील यावर आता धानोरकरांच्या यशापयशाचे गणित अवलंबून आहे . तर मित्रपक्ष असलेले उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे संदीप गिर्हे यांचाही प्रचारात सहभाग दिसत नाही .त्यामुळे पक्षांतर्गत असलेला कलह , नेत्यांचे रुसवे फुगवे निवडणुकीच्या प्रचाराचा अंतिम टप्पा आला तरी कमी होताना दिसत नाही.




शाम हेडाऊ

हीच परिस्थिती भारतीय जनता पार्टीची सुद्धा आहे. चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवर ज्यांचा महाराष्ट्र सरकारला पाठिंबा आहे असे प्रचंड मताधिक्याने चंद्रपूर विधानसभेत विजयी झालेले उमेदवार असले तरी त्यांचा मुनगंटीवार यांच्या प्रचारातील सहभाग हा फक्त नरेंद्र मोदी यांच्या प्रचार सभेत स्टेजवरच्या उपस्थिती पुरता मर्यादित राहिलेला दिसतो आहे . माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री व तीन वेळा चंद्रपूर वणी आर्णी लोकसभेचे खासदार राहिलेले हंसराज अहिर हे सुद्धा प्रचारामध्ये सक्रिय झालेले दिसत नाही . त्यामुळे सुधीर मुनगंटीवार हे सुद्धा आपल्या मित्रपक्षांसोबतच पक्षांतर्गत असलेल्या कलहापासून दूर राहिलेले नाहीत तर त्यांना सुद्धा या अंतर्गत कलहाचा सामना करावा लागतो आहे.
एकूणच निवडणुकीचे तयारी आता अंतिम टप्प्यात आली असून प्रचाराला केवळ दोन दिवस शिल्लक राहिले आहेत तर मतदानाला चार दिवस शिल्लक राहिले असताना दोन्ही महत्त्वाच्या पक्षांमध्ये " गोलमाल है भाई सब गोलमाल है" असंच चित्र आज दिसत आहे. असं असलं तरीही प्रतिभा धानोरकर यांनी ग्रामीण भागातून प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणात आघाडी घेत आपण अजूनही निवडणुकीच्या रणांगणामध्ये स्वतः स्टार प्रचारक म्हणून पूर्ण ताकदीनिशी लढण्याचा निर्णय घेतलेला दिसतो आहे . तर सुधीर मुनगंटीवार हे सुद्धा आता अंतिम टप्प्यात आलेल्या प्रचाराच्या वेळी आपल्या पक्षातील लोकांसोबत तसेच मित्र पक्षातील लोकांसोबत जुळवून घेतील का ? आणि जातीच्या राजकारणात आपल्या सोबत असलेले आपलेच पदाधिकारी आपल्यासाठीच शेवटपर्यंत आपलाच प्रचार करत आहेत की ?????? ..... या प्रश्नाच्या उत्तरात विचलित होतील ? असा महत्त्वाचा प्रश्न आता चंद्रपूरकरांना पडला असून 19 तारखेला होणाऱ्या मतदानामध्ये नेमकं काय दडलेलं राहील याचं उत्तर चार जूनला मिळेल असं दिसतंय . तोवर गोलमाल है सब भाई गोलमाल है अस म्हणत या निवडणुकीचा आनंद घेतांना दिसत आहेत .

# मोदींचा इशारा

आधुनिक केसरी

केंद्रातील भाजपा सरकारने २०१८ साली राजकीय पक्षांना देणग्या देण्यासाठी निवडणूक रोखे (इलेक्टोरल बॉंड्स) ही योजना आणली होती. या माध्यमातून राजकीय पक्षांना देणग्या मिळत होत्या. मात्र, या निवडणूक रोखे योजनेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे योजना असंविधानिक असल्याचे नमूद करत निवडणूक रोखे योजना रद्दबातल ठरवली. यानंतर न्यायालयाने सर्व निवडणूक रोख्यांची माहिती खुली करण्यास सांगितले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निवडणूक रोख्यांचा तपशील जाहीर करण्यात आला. यामध्ये गेल्या पाच वर्षांत देशभरात जेवढे निवडणूक रोखे वटवण्यात आले, त्यापैकी ५० टक्के निवडणूक रोखे फक्त भाजपाने वटवले होते. त्यावरुन विरोधी पक्षांकडून भाजपावर टीका करण्यात आली. तसेच यामध्ये मोठा घोटाळा झाल्याचा आरोप अनेकवेळा कॉंग्रेसने केला. आता या संपूर्ण प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एएनआय'ला दिलेल्या मुलाखतीत भाष्य केले आहे. निवडणूक रोख्यांसंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर मोदी म्हणाले, "निवडणूक रोखे होते म्हणून आपल्याला पैशांचा माग काढता आला, म्हणजे कोणत्या कंपनीने दिले? कसे दिले? कुठे दिले? त्यामुळे मी म्हणतो की, प्रामाणिकपणे कधी विचार केला तर सगळ्यांना पश्चाताप होईल (निवडणूक रोखे रद्द करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर)", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधीबाबत अधिक स्पष्टता यावी, यासाठी मोदी सरकारने २०१७ च्या वित्त विधेयकाद्वारे निवडणूक रोख्यांची संकल्पना मांडली. त्यानंतर मार्च २०१८ मध्ये ही योजना प्रत्यक्षात आणली. या योजनेच्या माध्यमातून राजकीय पक्षांना देणग्या देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवले जात होते.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# खरंच शिव उबाठा नकली शिवसेना

आधुनिक केसरी

**केवळ मुख्यमंत्री पदासाठी ओरीजनल शिवसेनेने नको त्या विचारांची लाचारी पत्करली. हिंदुत्वाचा मुळ अजिंडा मातोश्रीच्या डाव्या बाजुला पसरलेल्या निळ्या समुद्रात गट्ठा बांधुन फेकुन दिला. राज्यातील मतदारांनी दिलेल्या जनादेशाचा अनादर करत भाजपाची संगत तोडली. चोराच्या उलट्या बोंबा मारल्यासारखं आव आणत खापर भाजपावर फोडण्याचा प्रयत्न अजुनही सद्याची शिव उबाठा करताना दिसते. राजकियदृष्ट्या मुळ शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आल्यानंतर शिल्लक अस्तित्व राहिलेल्या शिवसेनेला ज्यांना स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान केलेला चालतो.**

अशा बेगड्या लोकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांनी नकली शिवसेना म्हटलं तर नाकाला मिरच्या का झोंबल्या? नैतिकता असेल तर आजही आत्म स्वरूपाची परीक्षा स्वतः घेतली तर आपण आता शिल्लक राहिलेले खरंच नकली शिवसेना आहोत याची खात्री तुम्हाला याची देहि, याचि डोळा पटल्याशिवाय रहाणार नाही. नकली शिवसेना म्हटल्यानंतर तुमचं पित्त खवळलं आणि तुम्ही राजकारण व्यक्तिद्वेषाच्या वळणावर टाकुन शिव्या घालत शिमगा करू लागलात. लक्षात घ्या, राज्यातील हिंदुत्ववादी मतदारांना तुम्हाला नकली म्हणणं खुपच आवडलं ज्याची टक्केवारी ९२.५ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपूर दौऱ्यात जाहिर सभेत बोलताना राज्यात असली शिवसेना एकनाथ शिंदेच्या रूपाने आमच्याकडे आणि नकली शिवसेना शिव उबाठाच्या रूपाने विरोधाकडे असल्याचे बोलुन गेले. त्याच शब्दाचा पुर्नउच्चार देशाचे गृहमंत्री अमित शहा नांदेड लोकसभा निवडणुक दौऱ्यात प्रचारसभेत करून गेले. असली आणि नकली अर्थात ज्याला व्यापारी भाषेत प्रिमिअम आणि दुय्यम कदाचित डुप्लीकेट असंही म्हटल्या जाते. बहुरूपी ज्याला डुप्लीकेट आणि तसाच प्रकार राज्यात दिसुन येतो. स्व. बाळासाहेब ठाकरेंनी हिंदुत्वाच्या रक्षणासाठी मुळ विचाराणे शिवसेनेची स्थापना केली. कुठल्याही प्रश्नावर तडजोड कदाचित झाली असेल पण हिंदुत्वाच्या मुद्यावर कुणासोबत देखील तडजोड बाळासाहेबांनी केली नाही. शरद पवारांच्या सोबत वैयक्तिक मैत्री जपली पण वैचारिक अर्जिड्याच्या बाहेर त्यांनी कधीच पाहिलं नाही. कालांतराने याच मुद्यावर जो भाजपा स्थापनेपासुन नव्हे तर १९२५ संघ परिवार, जनसंघ ज्यांचा उद्देश हिंदुत्व रक्षणाचा होता. म्हणुनच कदाचित चार-पाच वर्षे नव्हे तर तब्बल २२-२३ वर्षे राज्यात आणि देशात स्व. बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेल्या मुळ शिवसेनेसोबत भाजपाची युती होती. ती शिवसेना असलीच होती. जी आज मातोश्रीच्या बंगल्यात दिसत नाही. गंमत बघा, २०१४ ला देशात व्यवस्थेच्या रचनेत परिवर्तन झालं. नरेंद्रजी मोदी यांचे नेतृत्व ज्यात मुळ शिवसेनेचा सहभाग होता. २०१९ ला देखील मुळ शिवसेना भाजपसोबत होती. लोकसभा निवडणुकीत तर केवळ मोदी किमयामुळे तत्कालीन शिवसेनेचे अठरा खासदार निवडुन आले.

केंद्रिय मंत्रीमंडळात देखील सत्तेचा वाटा सन्मानाने दिला होता. कारण मुळ शिवसेना आणि भाजप यांच्यासमोर असलेले उद्दिष्ट आणि धोरण एकच होतं. वैचारिक अर्जिडा जवळपास सारखाच. त्यामुळे मोठा भाऊ म्हणुन देखील भाजपाने नेहमीच सन्मान केला. खरं तर पित्याच्या निधनानंतर हे सारं अस्तित्व टिकवण्याची जबाबदारी उद्धवजी ठाकरे यांच्यावर होती. पण जेव्हा व्यक्ती स्वार्थाने माणुस धृतराष्ट्राच्या भुमिकेत जातो आणि शकुनीसारखे संजय त्यांच्या सोबत असल्याने धृतराष्ट्राच्या भुमिकेतुन महाभारत घडतं ज्यामुळे अस्तित्व रसातळाला जातं. तसंच काही मुळ शिवसेना आणि भाजपा यांच्या बाबतीत घडलं असं म्हटलं तर सत्य



कुणी नाकारणार नाही. मोदी-शहा असं का म्हणाले की शिवसेना असली आणि नकली ? हे पाळण्यातल्या लेकराला जरी कुणी विचारलं तरी स्मरण करून निश्चितच तो देखील वर्तमान उबाठा शिवसेनेला नकली शिवसेना म्हणेल.

याचे कारणं फार खोलात जावुन बघण्याची गरज नाही पण नकली म्हणण्यामागे केवळ दोन-तीन प्रश्नाचा ऊहापोह या ठिकाणी करून पाहिला तर लक्षात असं येतं की २०१९ला राज्यात विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप-शिवसेनेला राज्यातील जनतेने कारभार करण्याचा जनादेश दिला होता. साधं सुधं नाही तर १६० पेक्षा जास्त बहुमताने जनादेश होता. मात्र केवळ व्यक्ती स्वार्थासाठी मातोश्रीच्या रखवालदारांनी जनादेशाचा चक्क अपमान केला. अनेक कुभांडं रचल्या गेली. ज्याची चर्चा आज करण्याची गरज नाही. कुठल्याही परिस्थितीत भाजपासोबत जायचं नाही हाच एवढा चंग निवडणुक नंतर बांधला. थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि ते केवळ शरद पवारच करू शकतात. या महाभारतात शकुनीच्या भुमिकेत संजय राऊतांनी उत्कृष्ट कामगिरी केली ज्यामुळे बावीस वर्षाची भाजप आणि मुळ शिवसेना युती दुभंगली आणि हे सारं करताना उद्धवजी ठाकरेंनी हिंदुत्वाचा अजिंडा चक्क समुद्रात फेकुन दिला. मुख्यमंत्री झाले. त्यांचा कारभार सिल्वर बंगल्याच्या आदेशावरूनच झाला. भ्रष्टाचाराचे अनेक प्रकरण गाजले. १०० कोटीच्या वसुलीत गृहमंत्री जेलात गेले. मुख्यमंत्री उद्धवजीचा कारभार घरात बसुनच झाला आणि सगळ्यात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे भुमिका बदलल्यानंतर ज्यांना श्रीराम मंदिर मुर्ती प्रतिष्ठापनेलासुद्धा जावु वाटलं नाही केवळ आपला चेहरा धर्मनिरपेक्ष दाखवण्यासाठी ज्यातुन मताचं लांगुनचालन करण्यासाठी. बाकी ज्या सोनियाच्या दरबारात पायपुसणं करून घेतलं त्या राहुल गांधीनं स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जाहिर अपमान करून देखील मुख्यमंत्री पद टिकवण्यासाठी शिवसेनेनं चिकार शब्द काढला नाही.

कालांतराने एकनाथ शिंदेसारख्या तब्बल ४० आमदारांना ज्यांचं आयुष्य हिंदुत्वाच्या प्रखर तेजाने गेलं. अशी सारी मंडळी नेत्याविरोधात बंडाच्या पावित्र्यात आली. ठाकरे गटाला सोडून बाहेर पडली. केवळ हिंदुत्वाच्या मुद्यावर. राज्यात स्थिर सरकार असावं आणि शिंदे गट हिंदुत्ववादी विचारावर बाहेर पडला. हे भाजपाच्या लक्षात आल्याबरोबर पुन्हा याच मुद्यावर राज्यात दोघांनी मिळून स्थिर सरकार महाराष्ट्राला दिलं. ज्या काळात किमान हिंदु धर्माचे देव-देवता सुरक्षित दिसतात. महाविकास आघाडीच्या काळात खा. नवनित राणाला हनुमानचालिसा देखील वाचु दिली नाही. ४० आमदार, डझनभर खासदार शिवसेना सोडुन बाहेर पडल्यानंतर कायद्याने लोकप्रतिनिधीच्या संख्या बळावर मुळ शिवसेना म्हणुन शिंदे गटाला मान्यता मिळाली आणि आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच खऱ्या अर्थाने स्व. बाळासाहेब ठाकरेंच्या विचाराची मुळ शिवसेना सक्षमपणे चालवताना दिसतात. हे खरंच आहे की, शिंदे गटाची असली शिवसेना आणि शिल्लक राहिलेल्या उबाठा गटाची नकली शिवसेना राज्यातील जनतेला देखील मान्यच आहे. मग आता लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे अशा बेगड्या, नाटकी शिवसेनेला नकली शिवसेना म्हटलं तर शिव उबाठाचे नेते उद्धवजी ठाकरे, खा. संजय राऊताच्या नाकाला मिरच्या झोंबण्याचं कारण काहीच नाही. छातीवर हात ठोकुन ही मंडळी खऱ्या अर्थाने जर आत्म स्वरूपाच्या साधनेला बसली तर निश्चितच आपण आता नकली शिवसेना रक्षणकर्ते आहोत याची खात्री त्यांना पटल्याशिवाय रहाणार नाही. कारण नियतीला देखील ही मंडळी असली आहे हे पटणारच नाही ज्यांनी केवळ राजकिय स्वार्थापोटी नको नको त्या गोष्टी ज्या की मुळ शिवसेनेच्या तत्वात बसणारच नाही हे सारं वर्तमान राजकिय परिस्थितीत राज्यात मागच्या दोन-तीन वर्षापासून केलं. आता ओरडून फायदा काय? नकली असली जेव्हा पंतप्रधान बोलुन गेले तेव्हा या प्रश्नावर राज्यातील सामान्य जनतेने आणि प्रखर हिंदु शिवसैनिकांनी देखील मोदी-शहाच्या भुमिकेचे कौतुक केले.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# वानर रावणाचा पक्षधर  झाला नाही हीच प्रभू श्रीरामांची ताकद होती

आधुनिक केसरी

**सोन्याची लंका पाहुण देखील एकाही सत्य, न्याय, निती, निष्ठा, हे धर्माचे आधारस्तंभ असतात. सत्य मार्गावरील आचरण हिच धर्माची खुप मोठी ताकद असते. जगातील मोठ्यात मोठं साम्राज्य देखिल धर्माची ताकद विकत घेऊ शकत नाही. धर्म हा कोणत्याही परस्थिती मध्ये अचल प्रतिष्ठित अखंड सत्यनिष्ठ असल्याने स्थिर असतो. अधर्म हा दिशाहिन असल्याने त्याच निश्चित असं स्थान निर्माण होत नाही.पण धर्म हा धर्म असतो. आदर्श पथदर्शक तर असतोच पण कित्येक पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत देखिल असतो. सोन्याची लंका पाहुण वानरांच मन बुद्धी, निष्ठा बदलली नाही. आपण लहान सहान बाबींसाठी सुद्धा निष्ठा, नैतिकता नितिमता,पायदळी तुडवून पुढे मार्गक्रमण करतो.**

म्हणजे आपल्या पेक्षा वानर सेना श्रेष्ठ ठरते.मग आपलं चरित्र नेमकं कुठे डगडगत आणि आपण रामायणातुन नेमकं काय शिकलो.आपणं स्वतःला अंतर्मुख केलं तर आपण नक्की खात्रीने सांगू शकतो कि आपण आता कोठे आहोत.युद्धाच्या अनुषंगाने लंकेच्या दिशेने मार्गक्रमण करताना भगवान प्रभु श्रीराम यांच्या सोबत असणारी वानर सेना याच वानर सेनेतील लाखो वानर वीर व राक्षस सेना यांच्या मध्ये जेव्हा प्रत्यक्षात युद्ध आरंभ झाल तेव्हा लंकापती रावणा याने प्रभु श्रीराम यांच्या सैन्यातील अनेक वानर वीर तथा सैनिका यांना वेगवेगळ्या पद्धतीचे अमिष दाखवली आणि आपल्या बाजुने वळविण्याचा अथवा युद्ध सोडुन माघार घेण्याचा देखील प्रस्ताव दिला रावणाची लंका सोन्याची होती.सोन्याच्या नगरीचा राजा आणि त्याने दाखवलेली अमिष या अमिषाला एकाही वानरा बळी पडला नाही भुलला नाही अथवा बेईमान झाला नाही तसंच सोन पाहुण स्वार्थ जागा झाला एवढी प्रचंड मोठी ताकद प्रभु श्रीराम यांच्या सहवासात होती.तस पाहिलं तर वानर आणि मनुष्य या मध्ये खूप मोठं अंतर आहे.वानरांनी जी निष्ठा प्रमाणिकता दाखवली ती कौतुकास्पद असुन आपल्या कित्येक पिढ्यांच्या साठी प्रेरणादायी आहे.आपण मनुष्य असताना सगळ्या बाबीचं ज्ञान असताना देखिल छोट्या छोट्या गोष्टी पाहुण आपलं मन विचलित होत.सत्याच्या बाजूने उभा रहण अथवा सत्याच्या वतीने लढण हा धर्म असतो.मग सत्याच्या पुढे लोभ मोह,माया स्वार्थ हे सगळं शून्य आहे.वेळ प्रसंगी प्राण गेला तरी हरकत नाही पण सत्य पथ मार्ग सोडणे नाही.पण आज सत्याच्या मार्गावर वर्दळ खुप कमी झाली आहे. असत्याच्या मार्गावर मांयदाळ गर्दी आहे.जो तो असत्याच्या रथावर विराजमान होण्यासाठी अतुर आहे.अगदी छोट्या छोट्या लहान लहान बाबींसाठी देखिल आपली निति न्याय धर्म बदलतो. आणि आपण आपल्या समाधानासाठी पाहिजे तशी त्याची व्खाया बदलतो.पण मुळ स्वरूप बदलण शक्य नसतं.आपण नेमकं रामयणातुन काय शिकलो मग दिखावा महत्वाचा नसतो.कृतीला खुप मोठ महत्व आहे.कृती जर सत्य असेल तर आपण असु नसु सत्याची अभिव्यक्ती म्हणून युगो युगे आपला गौरव हा होणारच पण आपण असत्य स्वीकारून सम्राटा झालो तरी सुद्धा आपण फार काही मिळवलं असं आपल्याला वाटत असल तरी सुद्धा कोणत्याही युगात ते युग आपल्याला सत्याची अभिव्यक्ती बहाल करू शकत नाही.महणुन चरित्र निर्माण करता आलं पाहिजे.रामायणातील युद्धाच्या वेळी वानरांच जे चरित्र निर्माण झालं त्या बरोबरीत तुलनेत आपण कुठे आहोत याचं सार्वजनिक पातळीवर नाही करता आलं तरी आत्मिक चिंतन आपण केलं तर खुप मोठा बदल आपल्या जीवनात नक्कीच झाल्याशिवाय राहणार नाही.काय मिळालं काय नाही मिळालं या पेक्षा आपण कोणत्या रथावर आरूढ आहेत हे वेळोवेळी तपासण्याची आवश्यकता आहे.आणि चुकुन आपण असत्याच्या रथावर स्वार असु तर वेळ गेलेली नाही आपण सचेत होऊन पुन्हा आपल्या सत्य मार्गावर येऊ शकतो.एवढं जरी करता आलं तरी रामायणाच सार्थक झालं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739





# आयडीए बुलढाणातर्फे निरंतर दंत शिक्षण अभियाना अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेतर्फे दिनांक 13 एप्रिल 2024 रोजी निरंतर दंत शिक्षण अभियाना अंतर्गत डॉक्टर नेहा सोधी खजुरिया यांच्या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन हॉटेल नर्मदा हॉलिडेज येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉक्टर नीता जतकर यांनी भूषविले. सर्वप्रथम धन्वंतरी पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील हिरडी रोग तज्ञ डॉक्टर नेहा सोधी खजुरिया यांनी हिरडी च्या आजाराविषयी तसेच खंडलेल्या दाताची लांबी वाढवण्यासाठी करण्यात येणाऱ्या क्राऊन लेदनिंग प्रोसिजर या विषयावरती मार्गदर्शन केले.

दात खंडलेला असल्यास किंवा दाताची उंची कमी असल्यास त्यावरती क्राऊन लावण्यासाठी हिरडीचा भाग कट करून दाताची उंची वाढवून त्यावरती क्राऊन लावण्यासाठी जी प्रक्रिया केली जाते त्याला क्राऊन लेंदनिंग प्रोसिजर असे म्हणतात. यावेळी इंडियन डेंटल असोसिएशन शाखेचे अध्यक्ष डॉ शरद जुमडे, सचिव डॉ. सचिन किनगे, कोषाध्यक्ष डॉ नितीन वाघ, डॉ. आरती पाटील, डॉ. संजय गवळी, डॉ. वृषाली गवळी, डॉ. कैलास गवई, डॉ. राजेश जतकर, डॉ. प्रवीण नरवाडे, डॉ. अभिजीत जाधव, डॉ. गीतिका सदावर्ते, डॉ. साकेत सदावर्ते, डॉ. चंचल आडवे, डॉ. मयुरी आंबेकर, डॉ. शरद काळे, डॉ. रश्मी काळे व अन्य मेंबर्स उपस्थित होते.

# महागाव येथे गारपिटीमुळे सोलर पंपाचे मोठे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यात नुकत्याच झालेल्या गारपिटीने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. 9 एप्रिल ला संध्याकाळी पाचच्या दरम्यान रिसोड तालुक्यात अतिशय भयानक गारपीट झाली. यामध्ये यामध्ये महागाव शिवारातील रामभाऊ गणपतराव यांच्या शेतातील शक्ती कंपनीचा सोलर पंपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

नऊ एप्रिलच्या सायंकाळी झालेल्या गारपिटीने तालुक्यातील पळसखेड, खडकी सदार, करडा, धोडप, महागाव, सवड आदी अनेक गावांना अक्षरशः झोडपून काढले आहे. परिणामी शेकडो हेक्टर क्षेत्रातील उन्हाळी मूग, बीजवाई कांदा, भुईमूग, ज्वारी आदी पिकांसह फळबागा भुईसपाट झाल्या आहेत. गावरान आंब्याच्या कच्च्या कैऱ्या गळून पडल्या आहेत. तसेच शेतातील सोलर पंपाचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



नऊ एप्रिला संध्याकाळी पाचच्या दरम्यान मोठ्या प्रमाणात गारांचा पाऊस पडला होता. या गराचा पावसामुळे आमच्या सोलार पंपाचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच उन्हाळी मूग, भुईमूग, बीजवाई कांदा याचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

(शेतकरी रामभाऊ गणपत वाटणे) महागाव

# 'लव्ह जिहाद'चा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन मारहाण; कोपरगावात एकावर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शहरातील अडत व्यापारी इसम हा आपले हात उसने घेतलेल्या १२ लाख रुपयांपैकी ०६ लाख राहिलेली रक्कम मागण्यासाठी गेला असता ब्रिजलालनगर कोपरगाव येथील आरोपी बाळासाहेब उत्तमराव गाढे याने फिर्यादी तन्वीर मोहंमद हनिफ रंगरेज (वय-४०) यास,"लव्ह जिहाद,बलात्कार,आदी सारख्या खोट्या खटल्यात अडकून टाकील" अशी धमकी देऊन बाजूस पडलेली विट उचलून फिर्यादीच्या डोक्यात मारली असल्याचा गुन्हा कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल झाल्याने कोपरगाव शहरासह तालुक्यात खळबळ उडाली आहे.

सदरचे सविस्तर वृत्त असे की,"वर्तमानात 'लव्ह जिहाद' हा जिवंत विषय ठरला असताना व मागील काही वर्षात त्यावर देशभर रणकंदन झालेले असताना कोपरगाव शहरात एक विचित्र घटना उघडकिस आली आहे.यातील फिर्यादी तन्वीर रंगरेज याने आरोपी आरोपी बाळासाहेब गाढे यास सुमारे १२ लाख रुपये हात उसने दिले असल्याचे म्हटले असून त्यातील ०६ लाख रुपये त्याने दिले होते व उर्वरित ०६ लाख रुपयांची रक्कम तो मागण्यासाठी शुक्रवार दि.१२ एप्रिल रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास आरोपी बाळासाहेब गाढे याचे ब्रिजलालनगर येथील घरासमोर गेला असता आरोपी बाळासाहेब गाढे याने धारणगाव रोड येथील फिर्यादी तन्वीर रंगरेज यास शिवीगाळ करून बाजूस पडलेली विट उचलून फिर्यादीच्या डोक्यात मारली आहे.व त्यास जखमी करून,"तू; जर मला दिलेले पैसे परत मागितले तर तुला बलात्कार,लव्ह जिहाद,सारख्या खोट्या गुन्ह्यात अडकून टाकील" अशी धमकी दिली आहे. दरम्यान या प्रकरणांनंतर आरोपी घाबरून त्याने कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन या प्रकारणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख व सहा. पो.नीं.मयूर भामरे आदींनी घटनास्थळी भेट दिली आहे.

दरम्यान त्यावरून कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध काल १९१/२०२४ भा.द.वि.कलम ३२४,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणी पुढील तपास कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस हे.कॉ. के.ए.जाधव हे करत आहेत.

दरम्यान या प्रकरणात फिर्यादी असलेला इसम हा रेशन घोटाळ्यासह कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात अनेक गुन्हयात अडकलेला असताना व त्याचा शहर पोलिसांत हद्दपारीचा प्रस्ताव पोलीस दप्तरी प्रलंबित असताना त्याने आरोपी बाळासाहेब गाढे यांचेवर हा गुन्हा दाखल केल्याने शहरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. त्याबाबत पोलीस अधिकारी काय भूमिका घेणार याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.



# कळसेश्वर विद्यालयाचे इन्स्पायर अवॉर्ड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात यश

## विज्ञान शिक्षक शिवाजी आवारी यांचे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**कळस :** सोलापूर येथे झालेल्या इन्स्पायर अवॉर्ड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात कळसेश्वर विद्यालया ने बनवलेल्या बहुउद्देशीय सायकल कोळपे या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय भारत सरकार, राज्य विज्ञान संस्था नागपूर व जिल्हा परिषद सोलापूर व अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 12 वे जिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड विज्ञान प्रदर्शन सोलापूर या ठिकाणी आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये कळसेश्वर विद्यालयाचे बहुउद्देशीय सायकल कोळपे या प्रतिकृतीची जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. विद्यालयाच्या कु.अक्षदा संजय वाकचौरे ह्या इ.10 वी च्या विध्यार्थिनीने सदर प्रतिकृती सादर केले. या प्रतिकृतीची राज्यस्तरावर निवड झाली आहे. या प्रतिकृतीला विज्ञान शिक्षक शिवाजी आवारी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या मॉडेलची राज्यस्तरावर निवड झाल्याबद्दल जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष सोन्याबापू वाकचौरे,संस्थेच्या सेक्रेटरी दुर्गाबाई नाईकवाडी,संस्थेच्या अध्यक्षा शैलजा पोखरकर,कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी, भाजपचे जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, रिपाई चे तालुकाध्यक्ष सरपंच राजेंद्र गवांदे, शिवसेना समन्व्यक रावसाहेब वाकचौरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष ईश्वर वाकचौरे, सोसायटी चेअरमन विनय वाकचौरे, उपसरपंच केतन वाकचौरे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनिता शेलार, गीतांजली खरबस, मच्छिंद्र साळुंखे, केशव महाले, कुमार पालवे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# मतदानाच्या सरासरीत पुरुषांपेक्षा महिलाच अग्रेसर; २०१९ पर्यंत २०.५५ टक्क्यांची वाढ

## सत्ता स्थापण्यात महिलांचा विश्वासच ठरणार निर्णायक

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत स्त्रियांना मतदान करण्याची अनुमती नव्हती. मात्र १९४७ साली देश स्वातंत्र्य झाला. आणि पाहिल्या सार्वत्रिक निवडणुकांपासून महिलांना मतदानाचा हक्क देण्यात आला आणि १९६२ मधे पहिल्यांदाच निवडणूक आयोगाकडून महिला व पुरुषांच्या मतदानाचे वेगवेगळे आकडे उपलब्ध करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पुरुषांची मतदानातील टक्केवारी ६३.३१ टक्के इतकी होती.तर महिलांची मतदानाची टक्केवारी ४६.६३ टक्के होती. मात्र २०१९ पर्यंत महिलांच्या मतदान टक्केवारीत २०.५५ टक्के वाढ झाली असून पुरुषांच्या टक्केवारीत उने - ३.७१ टक्केच वाढ झाली असल्याचे निष्पन्न झाले आहे. परिणामी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत पुरुषांची मतदानाची टक्केवारी ६७.०२ इतकी होती.तर महिलांची टक्केवारी ६७.१८ इतकी राहिली असल्याचे निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरील आकडेवारीवरून निष्पन्न होत आहे. त्यामुळे पुरुषांपेक्षा महिला मतदारांची संख्या कमी असून सुद्धा मतदानाच्या सरासरित पुरुषांपेक्षा महिलाच अग्रेसर असल्याचे स्पष्ट होत आहे.

सन २०१९ च्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीची आकडेवारी पाहता, एकुन ९ लाख ५८ हजार ५५० मतदारांपैकी ५ लाख ४३ हजार मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.यामधे २ लाख ८५ हजार ३६५ पुरुष तर २ लाख ५७ हजार ६६० महिला मतदारांचा समावेश होता. यामध्ये पुरुषांची टक्केवारी ५७.०२ तर महिलांची टक्केवारी ५६.२५ होती. सदर आकडेवारी पाहता जवळपास पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या १५ ते वीस हजारांनी कमी असून सुद्धा टक्केवारीत महीला पुरुषांच्या बरोबरीने येत आहेत. यावरुन महिलांची मतदानाविषयीची जागरूकता कौतुकास्पद आहे. त्यामुळे येत्या २६ एप्रिल रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीत पुरुषांपेक्षा महिलाच अग्रेसर राहणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

**जिच्या हाती मतदानाची जबाबदारी तीच देशाला उद्धारी :** जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशात



निवडणुकांमधील महिलांचा वाढता टक्का अभिमानास्पद आहे. गेल्या दोन निवडणूकीत महिला मतदारांनी सत्तापरिवर्तन घडविण्यात मोठी भूमिका निभावली असल्याचे बोलले जात आहे. त्यासाठी २०१९ च्या निवडणुकीतील महिलांच्या मतदानाची टक्केवारी पुरेशी आहे. कदाचित त्यामुळेच महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजकीय पक्षांकडून नवनवीन योजना आखल्या जात आहेत. मात्र तिकीट वाटपाच्या वेळी महिलांना महत्त्व दिले जात नाही ही खंत महिलांच्या मनात आजही बोचत आहे. परिणामी गाव असो या शहर आता महिला चार भिंतीत अडकून राहण्याच्या मनस्थितीत नाहीत. त्यामुळे पुरुषांच्या सूचनेनुसार त्या मतदानही करणार नाहीत. असं सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक महिलांच्या तोंडून ऐकविण्यात येत आहे. यावरुन निवडणूक प्रक्रियेतील महिलांची सक्रियता अधोरेखित होत आहे. त्यामुळे आगामी निवडणूकीत सर्व महिला जबाबदारीने मतदान करून देश कोणाच्या हाती सोपवायचा या महत्त्वपूर्ण निर्णयात मोलाच्या भागीदार ठरणार हे निर्विवाद सत्य आहे.


जिच्या हाती पाळण्याची दोरी |तीच जगाते उद्धरी ' या उक्ती प्रमाणे आता महिलांच्या हाती



निकालाची दोरी आली आहे. त्यामुळेच महिलांना आकर्षित करणाऱ्या योजना, कार्यक्रमाची घोषणा केल्या जात आहेत. कारण आजच्या नव्या पिढीतील महिला स्वत :चा निर्णय घेण्यास सक्षम आहेत. आणि त्या कोणत्याही दबावाला झुकणार नाहीत हे सर्वच राजकीय पक्षांना कळून चुकले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे महिलांची मतदानातील वाढती टक्केवारी हेच आहे."

**सौ .मीना विजय बुधवंत . ( सामाजिक कार्यकर्त्या, रिसोड )**

# रायगडावर शिवरायांना अन् चवदार तळ्यावर बाबासाहेबांना अभिवादन





आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वा राज्याभिषेक सोहळा वर्षानिमित्ताने तसेच आद्यशिवचरित्रकार महात्मा फुले यांची १९७ वी जयंती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती निमित्त महात्मा फुले विचार अभियान व फुले प्रेमीच्या वतीने अभिवादन कार्यक्रम संपन्न करण्यात आला.रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले. तसेच महाड येथील चवदार तळ्यावर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वंदन करण्यात आले. महात्मा फुले यांनी किल्ले रायगड येथील शिवसमाधीस विनम्र अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराजांचा पहिला पोवाडा लिहून सामाजिक क्रांतीसाठी पुणे येथे पहिली शिवजयंती साजरी केली होती.या क्रांतिकारी क्रांतिकार्याला उजाळा देण्यासाठी किल्ले रायगड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले विचार अभियान व फुले प्रेमीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवसमाधी अभिवादन करण्यात आले.महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित शिवप्रेमीना महात्मा फुले यांची प्रतिमा व गौरवपत्र प्रदान करण्यात आले.राजमाता जिजाऊ यांना पाचाड येथे अभिवादन करण्यात आले.महाड येथील क्रांतिस्थळ चवदार तळे येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून चवदार तळ्यातील पाणी क्रांतिजल कलशाचे सातारा कडे प्रस्थान झाले. डॉ.राजू जाधव अध्यक्ष महात्मा फुले सेवा संघ, रायगड, विराज जाधव राहुल जाधव देवासी जी, बाळारामजी, जयसिंग लोखंडे, संपतरावं जाधव, ॲड. सुनील नेवसे,राजेंद्र नेवसे, तुकाराम शिंदे, शीतल मालुसरे, कैलास महाजन, सुखदेव कदम व अजित जाधव यांनी विशेष सहभाग नोंदविला.जयसिंग लोखंडे यांनी आपल्या मुलाचा विवाह सत्यशोधक पद्धतीने करून समाजासमोर आदर्श निर्माण केला.डॉ राजू जाधव यांनी महात्मा फुले सेवा संघाच्या माध्यमातून फुले विचारांच्या प्रचार व प्रसार कार्याबद्दल महात्मा फुले विचार अभियान यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले. महात्मा फुले विचार अभियान संकल्पक संपतराव जाधव हे छत्रपती शिवाजी महाराज त्रिशताब्दी राज्यरोहण सोहळाकरिता हजर होते. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वा शिवराज्याभिषेक वर्षात या विशेष उपक्रमास वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षी हजर असल्याबद्दल विशेष कौतुक व सत्कार करण्यात आला. किल्ला परिसरामध्ये सेवाभावी कार्य तसेच गडावरील व्यवसायिक महिला भगिनीं यांचे गौरवपत्र देऊन विशेष सन्मानित करण्यात आले.

# मनगटात शिवबा, डोक्यात बाबासाहेब असले की काहीच अशक्य नाही. प्रा. कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालंका देवी शिक्षण प्रसारक संस्था सावळदबारा संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्नित कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय व छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावदळबारा यांच्या संयुक्त विद्यमाने महामानवाची जयंती साजरी करण्यात आली महाविद्यालयाचे प्राचार्य एन आर कोलते यांनी सर्वप्रथम महामानव भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.  बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून  विनम्र अभिवादन केले महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुद्धा अभिवादन केले  गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्यावतीने महामानवाला पुष्पहार अर्पण करण्यात आली प्रा.जीवन कोलते यांनी मानवाच्या १४ एप्रिल या सोनेरी दिवसाचे समाजाच्या आणि देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व आहे. देशातील कोट्यवधी दीनदुबळ्यांसाठी तसेच देशासाठी हा दिवस फार आनंददायी आहे. या दिवशी दिवसभर मोठ्या उत्साहाने खेड्यापाड्यांपासून ते दिल्लीपर्यंत डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते. डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी म्हणजे एम.ए. पदवीसाठी २५ जुलै १९१३ रोजी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश केला. प्रो. सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली जून १९१५ मध्ये एम.ए.ची पदवी संपादन केली.

ऑक्टोबर १९१६ मध्ये इंग्लंडमध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स येथे एम.एस.सी. इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश केला. प्रो. कॅनन आणि सेडनी वेब यांच्या मार्गदर्शनाखाली १९२० मध्ये पदवी संपादन केली. पुढे १९२२-२३ मध्ये युनिव्हर्सिटी इन बॉन जर्मनीमध्ये डी.एस. सी. पदवीचा अभ्यास पूर्ण केला व पदवी संपादन केली. म्हणजे एम.ए. , पीएच.डी., एलएल.डी., डॉ. डिलिट, बार ॲट लॉ इत्यादी पदव्यांनी उच्चविद्या विभूषित बाबासाहेब आंबेडकर झाले.बाबासाहेबांनी जगातील सामाजिक शास्त्रांचा (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहासशास्त्र आणि कायदा शास्त्र) सखोल अभ्यास केला.

.डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारताच्या नव्या उभारणीचे एक महान वैभव बनले होते.लोकशाही आणि राज्यघटना : जगातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी लोकशाही शासनाचा स्वीकार केला. त्यासाठी एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य आणि त्यांची एकच किंमत हा सिद्धांत दिला. ही राजकीय लोकशाही असली तरीही  त्याचे रूपांतर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीमध्ये व्हावे, असे त्यांना वाटत होते. तरच जगापुढे हा देश टिकेल अन्यथा अडचणीत येईल. यासाठी त्यांनी जगाला शोभेल आणि भारताला आधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगीण विकास करता येईल, अशी राष्ट्राला राज्यघटना दिली.२१ व्या शतकात देशाला विकासाच्या दिशेने जावयाचे असेल, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशिवाय पर्याय नाही, असे मला वाटते.यावेळेस महाविद्यालयातील भास्कर खमाट, मुकुंदा व्यवहारे,, गणेश मोहने, गणेश सत्रे, हिरालाल सोनवणे, मोहन बोरे,सतीश खवले, भूषण देसले, दिपक सपाटे, बाबासाहेब कोलते, रामचंद्र चिमणकर, संतोष जगताप, संजय राजपूत गावातील प्रतिष्ठान नागरिक व पत्रकार बंधू उपस्थित होते.




# स्व. रघुनाथ जाधव यांच्या जयंतीनिमित्त हिंदू खाटीक समाजाच्या वतीने कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय हिंदू खाटीक समाज नवी दिल्ली रजि. क्र.31375 ह्या राष्ट्रीय संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सामाज भूषण, स्व.रघुनाथ (नाना) जाधव साहेब यांची काल ९९ वी जयंती शहरातील जिल्हा शाखेच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी सर्व श्री.अमोल खिरडकर ,डॉ.रमेश रावळकर, छगनराव पारडे, प्रल्हाद माकोडे,आत्माराम लाड, तुळशीराम कल्याणकर, श्रीमती, शैलाताई लाड, सुनीता भोकरे, मोठ्या प्रमाणात हिंदू समाजबंधु /भगिनी यांची उपस्थिती होती. प्रारंभी स्व.रघुनाथ( नानाजाधव साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.श्री. अमोल खिरडकर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष बोलताना म्हणाले की, हिंदू खाटीक समाज ही संघटना आता राष्ट्रीय पातळीवर काम करत असून,देशातील हिंदू खाटीक लोकांना एकत्र करण्यात संघटनेचे बहुमूल्य असे योगदान राहिलेले आहे,

तर डॉ.रमेश रावळकर म्हणाले की,स्व.रघुनाथनाना जाधव यांना यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण,वसंतदादा पाटील व सीताराम केसरी यांचा सहवास लाभला होता. समाजकारण, राजकारण व सांस्कृतिक क्षेत्रात नानांनी जो ठसा उमटवला यात त्यांच्यावर यशवंतराव चव्हाण यांचे संस्कार झालेले होते म्हणूनच राजकारण अथवा समाजकारणात त्यांनी घवघवीत यश संपादन केले. यावेळी शिक्षण,समाजसेवा, उद्योग आणि साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संघटनेच्या कार्याचा अहवाल छत्रपती संभाजीनगर चें जिल्हाचें,अध्यक्ष छगनराव पारडे यांनी स्व. रघुनाथ नाना जाधव साहेब यांना त्रिवार अभिवादन करून, सांगितले की, स्व. रघुनाथ नाना जाधव यांनी समाजाचे उन्नती साठी,अखिल भारतीय हिंदू खाटीक समाज संघटनI नवी दिल्ली ची स्थापना केली, आणि संपूर्ण भारतात हिंदू खाटीक समाजाचा वटवृक्ष वाढविणेसाठी जीवनभर पराकIष्ठा केली. त्यांचे 99 वी जयंतीचें प्रसंगी, आपल्या समाजातील प्रतिष्ठित जेष्ठतम व्यक्ती, उद्योजक, गुणवंत विद्यार्थ्यांना जीवन गौरव पुरस्कार सन्मानपत्र देणे साठी निवड केलेल्या नावे अधोरेखित केली आणि संघटनेचे वतीने सध्या सुरु असलेलीकौटुंबिक समाज गणनेची, तसेच केलेल्या कामांची माहिती दिली, सदर कौटुंबिक गणनेचे साठी  सर्वांनी  सहकार्य करणे विषयी विनंती केली. उपस्थित गुणवंत विद्यार्थी व गुणवंत समाज बंधु /भगिनी याचा जीवन गौरव पुरस्कार सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमIमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय रत्नपारखी सर यांनी करून शेवटी प्रा.बाळासाहेब कंटाळे यांनी  उपस्थितIचे बंधु / भगिनी यांचे आभार मानले.कार्यक्रमाला भागवत कल्याणकर, अरुण कंटाळे, रामभाऊ माहोरे,तुळशीराम कल्याणकर, शांताराम खराटे जिल्हा संघटक , शैला लाड, संगीता कल्याणकर, सुनीता कल्याणकर,अनिता रावळकर,दिगिषा रावळकर, सुनीता भोकरे, डॉ.संकेत कल्याणकर,अक्षय कल्याणकर,उत्कर्ष कंठाळे व रूद्रा शीलवंत आदींची उपस्थिती होती.अशी माहिती अनुसूचित जाती जमातीचे शांताराम खराटे तालुका अध्यक्ष सोयगाव यांनी बोलताना दिली.



# वन्य प्राण्यांची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण; वनविभागाचे दुर्लक्ष

## सेवाभावी संस्थेने पाणवठ्यात टाकले पाणी !

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** सध्या सर्वत्र दुष्काळाची दाहकता वाढलेली आहे. त्यामुळे चारा व पाण्यासाठी वन्य प्राण्यांची मोठ्या प्रमाणात भटकंती होत आहे. हे ओळखून कोपरगाव तालुक्यातील वारी येथील सामाजिक संस्था राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टने वनविभागाच्या वन्य प्राण्यांसाठी  तयार करण्यात आलेल्या पाणवठ्यात टँकरद्वारे ५ हजार लिटर पाणी मोफत सोडून आपली सामाजिक बांधिलकी जपल्याचे दिसून आले आहे. वारी येथील सामाजिक संस्था राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्ट व राहुल (दादा) मित्र मंडळ,भरतवाडी यांच्या माध्यमातून नेहमीच समाज उपयोगी उपक्रम राबवले जातात. यावर्षीचा उन्हाळा फारच कडक असून वन्य प्राण्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे वन विभागाने येथील वन्य प्राण्यांसाठी तयार करण्यात आलेल्या पाणवठ्यात काटेरी झुडपे उगवलेली असून तो मातीने गच्च भरला आहे. सामाजिक जाणीवेतुन वारीतील सामाजिक संस्था राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्ट व राहुल (दादा) मित्र मंडळ,भरतवाडी यांच्या सौजन्याने पाणवठा स्वच्छ करून टँकरद्वारे शनिवारी (दि.१३) पाच हजार लिटर पाणी मोफत सोडण्यात आले.     एप्रिल महिना सुरू होऊनही या पाणवठ्याकडे वन विभागाचे सपशेल दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले. दरम्यान उष्णतेची तीव्रता लक्षात घेता प्रत्येक गावात वन्य प्राण्यांसाठी पानवठे तयार करून त्यात पाणी टाकावे असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टेके यांनी केले आहे. यावेळी वारीचे लोकनियुक्त सरपंच सतीश कानडे, गोदावरी बायोरीफायनरीजचे सेवानिवृत्त अधिकारी मदन काबरा, ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टेके, वनविभागाचे सेवानिवृत्त अधिकारी शांताराम गोरे, विजय जाधव, राजेंद्र मुरार, गणेश भाटी, पोस्टमास्तर संजय कवाडे, योगेश शिंदे, स्वप्निल टेके, सोनू चंदनशिव, भैय्या रोकडे यांच्यासह वन्यप्रेमी उपस्थित होते.

**पाणवठ्याकडे वन विभागाचे दुर्लक्ष !**
कोपरगाव तालुक्यातील वारी येथे गोदावरी नदीकाठी असलेल्या वनविभागाच्या जमिनीमध्ये वन्य प्राण्यांसाठी पाणवठा बांधण्यात आलेला आहे . परंतु, पाणवठ्यात काटेरी झुडपे व मातीने भरलेला होता . त्यावर स्थानिक मजूर व ट्रस्टचे स्वयंसेवक यांनी संपूर्ण पाणवठा स्वच्छ करून त्यात पाणी सोडले . सध्या सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष वाढलेले असताना मात्र ; वन्य प्राण्यांप्रती वनविभागाचे उदासीनता व दुर्लक्ष झाल्याची खंत वण्यप्रेमींनी व्यक्त केली आहे .

# दिव्यांग कर्मचाऱ्यांनाही निवडणुकीचे काम

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी शेवगाव यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांनाही सहभागी करून घेतले आहे. निवडणुकीच्या कामात दिव्यांगाना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, दिव्यांगांना निवडणुकीच्या कामातून वगळण्याची मागणी दिव्यांग संघटनांकडून होत आहे.निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार जिल्हा प्रशासनाने दिव्यांग कर्मचारी व शिक्षकांना निवडणुकीच्या कामातून वगळण्यात यावे, अशी स्पष्ट सूचना आहे. पण तालुकास्तरावर सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी दिव्यांग कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रियेत शिपाई या पदावर  नेमणुकीचे आदेश दिले आहे.  शिपाई पदासाठीअनेक कर्मचाऱ्यांना त्यासंदर्भातील पत्र आले आहे. अपंग कर्मचारी, शिक्षक हे कॅलिपर्स, कुबड्या, व्हीलचेअर्स, सुलभ संचार व्यवस्था, हाताने व पायाने अपंग असणाऱ्यांना लिखाणातील अडचणी, अल्पदृष्टी यांच्या दृष्टिदोषाच्या अडचणी, मूकबधिर, कर्णबधिर, चिन्ह भाषा, ऐकण्याच्या व संवादातील अडचणी आदींमुळे निवडणुकीसारख्या अति महत्त्वाच्या कामामध्ये अडथळा निर्माण होतो.त्यामुळे निवडणूक कामात नेमणूक केलेल्या अपंग कर्मचारी व शिक्षकांना निवडणूक आयोगाच्या पत्रातील सूचनेनुसार निवडणूक कामातून वगळण्यात यावे, अशी मागणी दिव्यांग कर्मचारी संघटनेचे  सदस्य यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# गोवंशांची वाहतूक करणारे वाहन पाठलाग करून पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** ७ गोवंशांची अवैध वाहतूक करणारे वाहन विशेष पथकाने पाठलाग करून पकडले. ही कारवाई १० एप्रिल रोजी पहाटे सावंगी वळण रस्त्यावर करण्यात आली असून याप्रकरणी दोघांवर फुलंब्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षकांचे विशेष पथक १० एप्रिल रोजी पहाटे पावणेदोन वाजण्याच्या दरम्यान पिसादेवी ते सावंगी बायपास रोडवर पेट्रोलिंग करीत असताना, त्यांना एक पिवळ्या रंगाचा टेम्पो (एम. एच. २० जीसी १९१९) भरधाव वेगाने नायगाव-सावंगीकडे जाताना दिसला. या वाहनाचा पोलिसांना संशय आल्याने त्यांनी पाठलाग करून चालकाला वाहन थांबविण्याचा इशारा केला; परंतु चालकाने वाहन न थांबविल्याने रात्री गस्तीवर असलेल्या फुलंब्री पोलिसांच्या मदतीने नायगावनजीक बॅरिकेट्स लावून वाहन अडविण्यात आले. यावेळी हे वाहन चालक व अन्य एक जण बॅरिकेट्स लगतच्या मोकळ्या जागेतून वाहन थांबवून अंधारात पळून जात असताना पोलिसांनी त्यांना पकडले. त्यानंतर त्यांची चौकशी केली असता, सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. यावेळी या दोघांनी आपले नाव डेव्हिड मायकल (सेलोराज टांगा स्टँड, बाजार छावणी व मोईन युनूस शेख (रा. पडेगाव, छत्रपती संभाजीनगर) असे सांगितले पोलिसांनी त्या वाहनाची झडती घेतली असता, त्यामध्ये ७ गोवंशीय जनावरे दाटीवाटीने भरल्याचे दिसून आले. नेवासा येथे नेली जात होती जनावरे चालकाकडे याबाबत कागदपत्रे आढळून आली नाहीत. त्याने ही जनावरे नेवासा येथे नेत असल्याचे सांगितले. पोलिसांनी या दोघांना ताब्यात घेऊन जनावरांसह टेम्पो जप्त केला. याबाबत फुलंब्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई विशेष पथकाचे सपोनि. सुदाम सिरसाठ, जमादार नवनाथ कोल्हे, रामेधर धापसे यांनी केली.



# वेरूळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरूळ येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि भीम नगर येथे महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना जयंती निमित्ताने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी महामानव यांच्या विषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी वेरूळ ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश पाटील मिसाळ, उपसरपंच विजय राठोड, ग्रामसेवक स्वप्नील घडामोडे, ग्रामपंचायत सदस्य हंसराज चव्हाण, नामदेव बकाल, सतीश लोखंडे, शेख नईम, राजेश आडे,माजी सरपंच कारभारी ढीवरे, पोलीस पाटील रमेश ढीवरे, मिलिंद ढीवरे, साईनाथ लोखंडे, विनोद ढीवरे, मुख्याध्यापक सुरेश बोरसे, ज्ञानेश्वर मिसाळ, सतीश फुलारे, संजय बनकर, शिवाजी गवळी व संपूर्ण शिक्षक वृंद यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कल्पना नगर मंडळाने केली उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 133 वी जयंती कल्पना नगर मंडळाने मोठ्या उत्साहात साजरी केली शनिवारी रात्री ठिक बारा वाजता आतिश बाजी करून महिलांनी पाळणा म्हणत भिम जन्माचे स्वागत केले. सकाळी लिंबूनि बौद्ध विहार येथे त्रिशरण पंचशील घेऊन बुद्ध वंदना केली ध्वजारोहण अजित पिंगळे यांच्या हस्ते झाले भिमाई महिला मंडळांनी 2133 लाडूचे वाटप केले जयंतीनिमित्त निबंध भाषण रांगोळी संगीत खुर्ची अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या संध्याकाळी मिरवणुकीमध्ये डीजेला फाटा देत सांस्कृतिक कार्यक्रम पुणे येथील सुप्रसिद्ध रायझिंग स्टार डान्स ग्रुपने शिवराय भिमराय व रमाई महापुरूषाच्या गाण्यावर नृत्य सादर करून जनतेला मंत्रमुग्ध केले सर्व भीम अनुयायांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला तसेच रंगीला चौकात अबाल तरुण असंख्य महिलांनी गाण्याच्या तालावर ठेका धरला यावेळी मल्हार राणा पाटील अजित पिंगळे मकरंद पाटील प्रणव चव्हाण माणिक बोंदर शिवाजी गिड्डे प्रकाश भडंगे किशोर वाघमारे सचिन तिरकर इम्रान मुल्ला भैया खंडागळे बुवा वाघमारे राजा बनसोडे अमित जाधव बाळासाहेब हौसलमल सौरभ गायकवाड साई गायकवाड सुरेंद्र शीलवंत नितीन अंगरखे बप्पा गायकवाड बाळू वाघमारे मनीषा बनसोडे गंगाबाई गायकवाड नलिनी बनसोडे चांदणी ताई गायकवाड पुतळा हौसलमल कमलबाई भालेराव अनिता गायकवाड विजया कांबळे कमल गवळी अहिरे काकू माया बनसोडे क्षितीजा बनसोडे आयोजकः जयंती प्रमुख सामाजिक कार्यकर्ते सतपाल बनसोडे बंडूभाऊ बनसोडे राहुल हौसलमल यांनी या सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



# शेतात पिकाला पाणी देत असताना रानडुकराचा शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** तालुक्यातील टाकळी येथील शेतकऱ्यावर रानडुकराने प्राणघातक हल्ला, केल्याने त्या शेतकऱ्याला गंभीर दुखापत झाली आहे. याबाबत समजलेली माहिती अशी की, धाराशिव तालुक्यातील टाकळी येथील शेतकरी सूर्यकांत पंढरीनाथ सौदागर वय ५५वर्षे हे दी.८एप्रिल रोजी दुपारी ज्वारी या पिकातील स्पिंकर बदलण्यासाठी आपल्या शेतात गेले असता एका रानडुकराने त्यांच्यावर प्राण घातक हल्ला केला, त्यामुळे त्यांच्या डाव्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली. त्यावेळी त्यांनी मोठमोठ्याने आरडा ओरड केल्याने शेजारील शेतकरी मदतीला धावून आल्याने रानडुकराने तिथून पळ काढल्यामुळे सौदागर यांचा जीव वाचला. त्यांच्या डाव्या गुडघ्याला झालेल्या गंभीर जखमेवर मुरुड येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. शेतकऱ्यांना रात्री- अपरात्री पाणी भरण्यासाठी शेतात वारंवार जावे लागते त्यामुळे रानडुकरांचा वाढता उपद्रव व पिकाचेही नुकसान होत असलेले नुकसान पाहता वनविभागाने रानडुकरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी वर्गामधून वारंवार होत आहे.

# त्रिशरण, पंचशीलचे सर्वांनी पालन करावे : माजी आमदार रोहिदास चव्हाण

## बौद्ध विहारात पंचरंगी व निळ्या ध्वजाचे आरोहण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** त्रिशरण, पंचशीलचे सर्वांनी पालन करावे तसेच संविधान हे बाबासाहेबांनी जगातील इतर राज्यघटनांचा अभ्यास करून मोठ्या कष्टातून संविधानाची निर्मिती करून सर्व देशवासीयांचा समाजातील सर्व घटकांचा विचार करून देशाला संविधान अर्पित केले. यावरोबरच सद्य स्थितीतील देशातील बदलत्या परिस्थितीचा विस्तृत आढावा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी त्रिरत्न बौद्ध विहार जुना लोहा येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना मनोगतात व्यक्त केले.तसेच शरद पाटील पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रथमतः त्रिरत्न बौद्ध विहार जुना लोहा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून,पुष्प पुजा,धुपपुजा करून वंदना घेण्यात आली.तद्नंतर पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण शिवसेना लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी केले. निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण कॉंग्रेस तालुकाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी केले. यावेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठू भाऊ चव्हाण, कॉंग्रेस चे तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, नगरसेवक करिमभाई शेख, माजी नगरसेवक उत्तम महाबळे,शिवाजी अंबेकर,चंद्रकांत पाटील नळगे, जेष्ठ पत्रकार सुरेश जोंधळे, रत्नाकर महाबळे, शिवराज पवार, मारोती कांबळे, शिवराज दाढेल,शुभम उत्तरवार,ससाणे,रेषमाजी दांगटे, गोविंद वड,मारोती पवार, पुठ्ठेवाड मामा,खादर मामु, कांग्रेस महिला आघाडीच्या पोर्णिमा कांबळे, सविता नागलगावे, छाया महाबळे यांसह बहुसंख्य महिला, पुरुषांची उपस्थिती होती. यावेळी जयंती मंडळाच्या वतीने उपस्थितांना खिचडीचे वाटपही करण्यात आले.सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सिद्धार्थ महाबळे यांनी तर आभार आयोजक उत्तम महाबळे यांनी मानले.



# ग्रामपंचायत सावळदबारा येथे डॉ. आंबेडकर यांची १३३ वी जयंती उत्साहात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा ग्रामपंचायत कार्यालय येथे दिनांक १४ एप्रिल ला विश्वरत्न महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा योगेश चोपडे, ग्रामपंचायत उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, ग्रामसेवक सुधीर भालेराव व ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर व पदाधिकारी पोलिस पा.विलास कुल्ले, फकीराभाऊ तडवी, शंकर औसरमोल,अमोल रावळकर, भागवत गायकवाड सर, गणेश खैरे सामाजिक कार्यकर्ते तथा ठेकेदार,ईशा तडवी,माजी सरपंच ताराचंद राठोड आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी मान्यवरांनी सांगितले की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्येक नागरिकाने आत्मसात करून आपले जीवनमान उंचावे प्रत्येक पालकांनी पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करावे असे यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार संघनक चालक अमोल रावळकर यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच देशाची अखंडता व राष्ट्रीय एकात्मता टिकून राहीली आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार हे भारतीय राज्य घटनेचा आदर करणारे सरकार असून अनेक क्रांतीकारक निर्णय घटनेच्या चौकटीत बसवून घेत असल्याचे मत प्रा योगेश चोपडे यांनी रविवारी ता. १४ रोजी व्यक्त केले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर म्हणाले की, एक कणखर पंतप्रधान देशाले लाभले असून भारतीय राज्य घटनेचा आदर करणारे पंतप्रधान आहेत. भारतरत्न डा. बाबासाहेब आंबेडकर यांचे आचार विचार समाज बांधवानी अंगिकारून आपल्या जिवनात यश संपादन करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले. तर यावेळी जि प शाळेचे भागवत गायकवाड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे आपल्या देशाची किर्ती जागतिक स्तरावर उंचावली असून भारतीय राज्यघटना वंदनीय माननारे पंतप्रधान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.आदी मान्यवर आणि पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या उपस्थित होते.

# मिरवणुकीदरम्यान चाकूहल्ल्यात युवक ठार

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** शहरात रविवारी भीम जयंती मिरवणुकीदरम्यान एकांतातील जागेत एका युवकाची चाकूने हल्ला करून हत्या करण्यात आली. यामुळे शांततेत पार पडलेल्या जयंती उत्सवाला गालबोट लागले असून शहरात खळबळ उडाली आहे. शहर पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळेच्या अंधारलेल्या परिसरात १४ एप्रिलला रात्री अकरा वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

आशुतोष संजय पडघन (२४) असे मृताचे नाव आहे. जुना वाद किंवा मिरवणुकीत झालेल्या खडाजंगीमुळे हा प्रकार घडल्याची चर्चा आहे. शहर पोलिसांना माहिती मिळताच आशुतोषला गंभीर जखमी अवस्थेत जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# सामूहिक भीमजयंतीला नेवासा येथे भीमप्रेमींचा जल्लोष

## महामानवाच्या जयघोषाने नेवासानगरी दुमदुमली; भीम गीतांच्या तालावर थिरकली तरुणाई...

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती नेवासा तालुक्याच्या वतीने सामूहिकरित्या आयोजित भीम जयंतीला सर्वधर्मीय व सर्वपक्षीय नागरिकांनी जय भीम चा गजर करत महामानवाला अभिवादन केले. भीम प्रेमींनी भीम गीतांवर ताल धरत जल्लोष केला यावेळी महामानवाच्या जयघोषाने नेवासानगरी दुमदुमली होती. तर भीम गीतांच्या तालावर तरुणाई ही यावेळी थिरकलेली दिसत होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने सकाळी विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये, विविध शाळांमध्ये तसेच चौकाचौकात विविध पक्षाच्या वतीने सर्वधर्मीय व सर्वपक्षीय नागरिकांनी एकत्रित येत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पित करत अभिवादन केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने एस टी स्टँड कॉर्नर वरील चौकात बॅरिकेट लावलेल्या जागेत सायंकाळी ७ वाजता सर्वपक्षीय व सर्व धर्मीयांच्या उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम झाला यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक बहुजन समाजाचे युवा नेते संजयनाना सुखदान व सौ.शालिनीताई सुखदान यांच्या वतीने प्रतिमेचे मेणबत्ती प्रज्वलित करून पूजन करण्यात आले. भीम सैनिक भास्करराव लिहिणार यांनी बुद्ध वंदना म्हटली. कु. प्राजक्ता थोरात या बालिकाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त करत सर्वांना आकर्षित केले.

यावेळी बोलताना उत्सव समितीचे संयोजक संजय सुखदान म्हणाले ही जयंती सर्वांची आहे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला बहुजन समाज या निमित्ताने एकत्रित आला आहे याचे मनस्वी समाधान होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांसह अठरापगड जातीतील बहुजन समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले सर्वसामान्याला अधिकार प्राप्त होण्यासाठी देशाला संविधान त्यांनी दिले म्हणून डॉ.आंबेडकर हे सर्व देशवाशीयांचे दैवत असल्याचे सांगून उपस्थित बांधवांना धन्यवाद दिले.

यावेळी झालेल्या अभिवादन कार्यक्रमाच्या नंतर मास्टर सुरेश लव्हाटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवकालीन खेळांचे प्रात्यक्षिके बालक व बालीकांनी सादर केले. दांड पट्टा चालवणे,लाठी फिरवणे, तलवार बाजी, भाला खेळाचा यात समावेश होता. छत्रपती शिवाजी महाराज की जय,जय भीम,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो असा जयघोष यावेळी उपस्थित नागरिकांनी टाळ्यांचा गजर करत केला.डोळे दिपवणाऱ्या तोफांची सलामी देत महामानवाला मानवंदना देण्यात आली.

यावेळी भीम गीतांच्या ध्वनिफितीवर महिलांसह बालकांनी सहभाग नोंदवत आनंद घेतला.तर उपस्थित महिलांनी डोक्यावर निळे फेटे परिधान करत निळे झेंडे हातात घेत जयंतीचा आनंद द्विगुणित केला.या जयंतीच्या निमित्ताने चौकाचौकात निळे झेंडे,कमानी लावल्याने वातावरण भीममय बनले होते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** भिमरत्न सामाजिक प्रतिष्ठान, सोनई टीव्ही ता.-नेवासा, जि.-अहमदनगर ( महाराष्ट्र राज्य.) आयु.-उदय संजय कर्डक .-(संस्थापक/अध्यक्ष/सचिव.) व सखल बहुजन समाज यांनी आयोजन केले होते. जयंतीनिमित्ताने अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विजय जगताप हे होते .विजय जगताप यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने नुकताच त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने गौरवलेले आहे. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांचा हि सन्मान करून तसेच तुषार दादासाहेब पाटोळे रा.धनगरवाडी सैनिक दलात नियुक्ती झाली. ॲड. इरफान बालम सय्यद रा.सोनई हे वकील झाल्याबद्दल या सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला तसेच सोनई पंचक्रोशीतील सामाजिक कार्यकर्ते बाजीराव भालेराव,भाऊसाहेब गायकवाड, समीर मगर, अमोल कर्डक, सोमनाथ वैरागर, किशोर वैरागर, रामेश्वर वैरागर, मुस्तकीम शेख, रितेश भालेराव, अविनाश वैरागर, सागर वैरागर, सचिन साळवे,अमोल चाबुकस्वार ज्येष्ठ नागरिक व सर्व भीमसैनिक यांच्या उपस्थितीमध्ये जयंती सोहळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आनंदमय वातावरण साजरी करण्यात आली .तसेच अनेक सामाजिक उपक्रम करून जयंती साजरीं करण्यात आली. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यांची व जीवनाचे आणि या देशासाठी दिल्या योगदानाचे मांडणी योग्यरीत्या करून जयंती सोहळ्याची सांगता सनीभाऊ साळवे यांनी केले.

# तहानलेल्यांची तहान भागवणे ही भारतीय संस्कृती : डॉ. अमरकुमार आनंद तायडे

आधुनिक केसरी न्यूज

**मलकापूर :** उन्हाळ्याची चाहूल लागताच आठवण येते ते ठीक ठिकाणी असणाऱ्या पाणपोईची. पारावर चढत लागतो तशी शहरी भागात पाणपोईची संख्या वाढत जाते . घशाला कोरळ पडली की पाण्याचे चार घोट प्यावेसे वाटतात शहरातील काही सेवा भावी संस्था व नागरिकांनी सुरू केलेल्या पाणपोई अनेकांची तहान भागवत असतात वैशाख वनवास सुरू झाला की रखरखत्या उन्हाला सुरवात होते. मग या काळात गरज लागते ती पाण्याची, दोन घोट जरी पाणी मिळाले तर अंगातले सर्व क्षीण दूर होते तसे मलकापूर शहराचा विचार करता अनेकांची काहीना काही कारणास्तव बाहेर गाव वरून येणाऱ्या प्रवाशाची संस्था जास्त असते. तर अशा लोकांना पाणपोईचा खरा आधार असतो. बाटली बंद महागळे पाणी सगळ्यांच घेऊ पिणे शक्य नसल्याने पाणपोई उपयुक्त ठरते. त्या अनुषंगाने मलकापूर येथील डॉ.अमरकुमार आनंद तायडे अनेक समज उपयोगी उपक्रम महाराष्ट्र मध्ये राबवित असतात, त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त त्यांचे वडिल कालकथीत आनंद काशिनाथ तायडे यांच्या स्मणार ॲक्वा वॉटरची मोफत पाणपोई रेल्वे स्टेशन येथे सुरू केली. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की, तहानलेल्याची तहानल्यांची तहान भागवणे ही आपली संस्कृती सांगते आणि तहानलेल्याना पाणी देण्याचे काम पाणपोई करत आहे.त्यावेळी बहुजन वंचित आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब दामोदर, द पीपल्स बहुउद्देशीय संस्था मुबंई महाराष्ट्रचे संस्थापक डॉ अमरकुमार आनंद तायडे, प्रा.नरेंद्र सुरडकर,ऍड प्रफुल तायडे, लीगल फायटरचे संस्थापक अध्यक्ष स्नेहल तायडे , ऍड विशाल इंगळे, पवन शिरसाट,धिरज इंगळे, शुभम सावळे,विश्वजित सावदेकर, अभिनाश उमाडे, पत्रकार सतीश दांडगे, सचिन डोगरे आदी उपस्थित होते.



# आझाद समाज पार्टीचे नयनरम्य आकर्षण

## भीमजयंतीनिमित्त आतषबाजीने मानवंदना

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 133 व्या जयंतीनिमित्त आजाद समाज पार्टीतर्फे नयनरम्य अशी आतिषबाजीचे आयोजन करून मानवंदना देण्यात आली होती. त्या ठिकाणी नवीन फायर फटाके पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोकांची गर्दी गोळा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती पुतळ्याच्या चारही बाजूस मोठ्या प्रमानावर फटाक्याची रोषणाई करण्यात आली होती ह्या ठिकाणी मा. दिलीप आप्पा साळवे यांच्या हस्ते अतिशबाजी ला सुरवात करण्यात आली यावेळी आजाद समाज पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आनंद लोंढे आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते मुकुंदराव शिरसाठ, धुळे जिल्हाध्यक्ष आबा अमृतसागर, शहराध्यक्ष भैय्या वाघ, जिल्हा संघटक महेंद्र बोरसे जिल्हा उपाध्यक्ष किरण भालेराव, भूषण जोशी निलेश जिरे आणि आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# देवळाना येथे डॉ. आंबेडकर जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे देवळाना बुद्रुक व खुर्द येथे महानिर्वाण भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. देवळाना बुद्रुक व खुर्द आंबेडकर वस्ती येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. यावेळी गावातील सरपंच नईम शहा, माझी सरपंच रियास पठाण, माझी उपसरपंच भानुदास काळे, माजी उपसरपंच भारत बनकर, माजी उपसरपंच दिलीप मालोदे, ग्रामसेवक जाधव , पोलीस पाटील शिंदे, पोलीस पाटील निसार सय्यद , प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष सय्यद युसुफ ,ग्रामपंचायत कर्मचारी युसुफ पटेल, माझी ग्रामपंचायत सदस्य खैराती पटेल ,सोसायटी चेअरमन सलीम पटेल, ग्रामपंचायत कर्मचारी अमजद पठाण, विठ्ठल साळुंखे, ज्ञानेश्वर मालोदे, संजू काळे, राहुल काळें, राजु बनकर, पोपट चाबुकस्वार, पोपट बनकर,बाबासाहेब काळें , सुमित चाबुकस्वार,दगडु बनकर,सिदु बनकर,सोनु बनकर कैलास बनकर ,दिलीप बनकर, पाशु पटेल, सुरेश बनकर, संदीप कीर्तीशाही, विठ्ठल कोरडे, कैलास बनकर, यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.



# संघर्षाशिवाय यश मिळत नाही : सुभाष गजभिये

## युनियन बँक ऑफ इंडिया, एससी एसटी एम्प्लॉइज असोसिएशनच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जीवनात संघर्ष केल्याशिवाय यश मिळत नाही.जो संघर्ष करतो तोच शेवटपर्यंत टिकतो.संविधानाने प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार दिलेला आहे.त्यामुळे खूप अभ्यास करा.खूप शिक्षण घ्या.कोणीही शिक्षण अर्धवट सोडून देऊ नका. ओंकारनगर शाळेतील चुणचुणीत विद्यार्थी पाहून खूप आनंद वाटला. शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घेत असलेली मेहनत पाहून खूप समाधान वाटले. शाळेचा निसर्गरम्य परिसर पाहून आपण भारावून गेलो आहोत, असे युनियन बँक ऑफ इंडिया अहमदनगर क्षेत्रीय कार्यालयातील उपक्षेत्र प्रमुख सुभाष गजभीये म्हणाले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युनियन बँक एससी.एसटी एम्प्लॉइज वेल्फेअर असोसिएशन पुणे झोनच्या वतीने केडगाव येथील अहमदनगर महानगरपालिकेच्या ओंकारनगर शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युनियन बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय कार्यालय अहमदनगरचे उपक्षेत्र प्रमुख सुभाष गजभीये होते.अतुल जाधव,धीरज कांबळे, ग्यानोजी गायकवाड, विशाल साबळे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे, यशवंत पाडळे यांची कार्यक्रमासाठी उपस्थिती होती.

प्रारंभी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकत



भाषणे केली. गोरगरीब व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण सुकर व्हावे यासाठी दरवर्षी आमच्या युनियन बँक ऑफ इंडिया एससी.एसटी असोसिएशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते,असे अतुल जाधव आपल्या मनोगतात म्हणाले.यावेळी विशाल साबळे यांनी विद्यार्थ्यांना सतत अवांतर वाचन करण्याचे आवाहन केले. शिवराज वाघमारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर सहशिक्षिका वृषाली गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती सदस्य रेश्मा पानसरे, दुर्गा घेवारे, संध्या तोडमल,पल्लवी भुजबळ, कविता वर्तले, काजल पाडळे, रोहिणी काळे, पुनम बडे, जाफर मोमीन, शितल शिरसाठ, विश्रांती कांबळे  यांची कार्यक्रमासाठी उपस्थिती होती. युनियन बँक एससी, एसटी एम्प्लॉइज वेल्फेअर असोसिएशन व यशवंत पाडळे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला.



# सुरेशनगर येथे टँकरने पाणीपुरवठा सुरू

## महिलांनी सुटकेचा निश्वास सोडला

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील आदर्शगाव सुरेशनगर येथे ऐन उन्हाळयात पाणीटंचाई जाणवू लागल्याने ग्रामपंचायतने केलेल्या पाठपुराव्यानंतर या गावात टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आल्याने पाणीसाठी भटकंती करणाऱ्या  महिलांनी अखेर सुटकेचा निश्वास सोडला. गावात आलेल्या टँकरचे पूजन यावेळी ग्रामपंचायतचे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ व सरपंच शैलाताई उभेदळ यांच्या हस्ते करण्यात आले. सुरेशनगर गावाला ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवू लागली. त्यामुळे महिलांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली होती, एरवी गावातील विहिरीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा ग्रामपंचायत मार्फत केला जात होता मात्र या विहिरीच्या पाण्याच्या पातळीने तळ गाठल्याने यासाठी आमदार शंकरराव गडाख यांच्या मार्फत जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करण्यात आला त्यामुळे गावासाठी टँकर मंजूर झाले असल्याने उन्हाळयात पाण्याचा प्रश्न सुटला आहे.

यावेळी सुरेशनगरगावचे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ, सरपंच शैलाताई उभेदळ,उपसरपंच मैनाबाई बाबर,नाथा बाबर, विठ्ठलराव पाषाण, माजी उपसरपंच भागचंद पाडळे,नानासाहेब क्षीरसागर, शिवाजी वाळके, बबन शेटे, दिलीप शेटे, भीमा चव्हाण,अविनाश खंडागळे, अशोक खंडागळे,ग्रामपंचायत सदस्य सतीश क्षीरसागर, विनोद निकाळजे, हर्षद पाटील, दत्ता पाडळे, किशोर उभेदळ, संजय वाळके, आशाताई उभेदळ, भारतीय बौद्ध महासभेच्या तालुकाध्यक्षा मीराबाई जाधव, बाळाबाई सावंत, छायाताई पाडळे, मीराबाई पाषाण, शोभाताई भणगे, सविता भणगे, सारिका उभेदळ उपस्थित होते

सुरेशनगरला कायमस्वरूपी पाण्याचा स्त्रोत कसा निर्माण यासाठी लवकरच प्लॅन तयार करण्यात येईल त्यानुसार उपाययोजना केली जाईल अशी ग्वाही सरपंच सौ. शैलाताई कल्याणराव उभेदळ यांनी पाणी टँकर शुभारंभ प्रसंगी बोलतांना दिली. यावेळी पिण्याचे पाणी भरण्यासाठी महिलांनी मोठी गर्दी केली होती.

# बांधकाम व्यावसायिकास मागितली दोन कोटींची खंडणी; नगर शहरातील प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** अहमदनगर शहरातील एका बांधकाम व्यवसाईकास आणि त्याच्या मुलास धमकी देऊन जमिनीवर ताबा मारण्याचा प्रकार पुन्हा उघडकीस आला आहे.ताबा सोडायचा असेल असेल तर 2,00,000 रुपयांची खंडणी मागितल्याचा गुन्हा एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

अहमदनगर शहरात जमिनी वर ताबे मारून खंडणी उकळचा हा प्रकार नवीन नाही. अशा ताबे मारण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहे मात्र गुन्हे दाखल करण्याची हिम्मत जागामालक दाखवत नसल्यामुळे ताबे मारणाऱ्याचे यामध्ये फायदा होतो. वडगाव गुप्ता परिसरात हेमचंद्र रामकृष्ण इंगळे या बांधकाम व्यवस्थेने एक मोकळी जमीन घेतली होती त्यावर सध्या प्लॉटिंग करण्याचे काम सुरू आहे. प्लॉटिंग कॉम सूर असताना त्या ठिकाणी रस्त्यावरील आणि लाईटचे पोल उभारले जात असताना नवनाथ कराळे याला मज्जाव केला तसेच ही जागा वडिलोपार्जित असून तुम्ही इथून निघून जा असे हेमचंद्र इंगळे यांना सांगितले मात्र नवनाथ कराळे यांच्याकडे कागदपत्रांची मागणी केली असता कोणतीही कागदपत्र नवनाथ कराळे यांच्याकडून प्राप्त झाले नाही तसेच कामगारांना शिवीगाळ करणे आणि कामात अडथळा आणणे असे प्रकार सुरू असल्यामुळे हेमचंद्र इंगळे हतबल झाले होते. नवनाथ कराळे हा कोणतेही कागदपत्र दाखवत नव्हता मात्र जर तुम्हाला पुढील काम करायचं असेल आणि माझा ताबा सोडायचा असेल तर 2,00,000 रुपये इतके रक्कम मला द्यावी लागेल अन्यथा तुम्ही इथून निघून जा नाहीतर मी तुमचे हात पाय तोडेल असा दोन्ही हेमचंद्र इंगळे यांना देण्यात आला.

त्यानंतर नवनाथ कराळे याने इंगळे केलेल्या प्लॉटिंग मधील रस्ते ट्रॅक्टरच्या सहाय्याने उखडून टाकले तसेच उभा केलेले लाईटचे बोलही तोडून टाकले.त्यानंतर इंगळे यांना आणि त्यांचा मुलगा धवल यांस वारंवार फोन करुन फोनवरुन सदर जागेचे मला पैसे दिल्या शिवाय कोणतेही कामकाज करायचे नाही असे म्हणत कराळे याने शिविगाळ व दमदाटी करण्यास सुरवात केली त्यामुळे अखेर या सर्व गोष्टींना कंटाळून हेमचंद्र इंगळे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात नवनाथ कराळे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यात भादवी कलम 385,447,427,504,506 प्रमाणे नवनाथ बाळासाहेब कराळे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# जैन वाचनालयात दोन तास सामूहिक वाचन करून डॉ. आंबेडकरांना केले अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** 14 एप्रिल रोजी बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयात दोन तास सामूहिक वाचन करून बाल वाचकांनी डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले. सकाळी 9 ते 11 दरम्यान साठ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. या पावनपवित्र दिनाचे औचित्य साधून एचएआरसी संस्थेने वाचनालयास 111 पुस्तकांची आनंदी वाचन पेटी भेट दिली.

जिल्हा परिषद परभणीचे प्राथमिक उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून  एचएआरसी संस्थेचे डॉ. पवन चांडक, अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्राचे जिल्हाध्यक्ष प्रकाश डुबे, ॲड चंद्रकांत राजुरे, वाचनालयाच्या अध्यक्षा मीना जैन, पवन ओझा ,बालाप्रसाद सोमानी, दीपक राजुरकर, सात्विक बुलबुले यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर वाचनालयाच्या वतीने अध्यक्ष व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पवन ओझा म्हणाले की, जैन वाचनालयाच्या वतीने विविध शैक्षणिक, सामाजिक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना विनामूल्य सभासद करून पुस्तके वाचण्यासाठी दिली जातात. त्यामुळे निश्चितच वाचन चळवळ  वृद्धिंगत होत आहे .



प्रकाश डुबे यावेळी म्हणाले की, जैन वाचनालय हे इतरांनी आदर्श घ्यावा असे असून ,वाचन चळवळ वाढविण्यासाठी विविध उपक्रम घेतले जातात आणि त्यामुळेच डॉ. पवन चांडक यांनी या वाचनालयास 111 पुस्तकांची आनंदी वाचन पेटी भेट दिली आहे. यातील दर्जेदार पुस्तके वाचून आपल्या ज्ञानात भर घालावी व त्यांच्या नोंदी ठेवाव्यात असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

डॉ.पवन चांडक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले की , ज्ञानदान व पुस्तकदान उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रुजवत येत्या उन्हाळ्याच्या सुट्टीत पुस्तकांशी गट्टी' उपक्रमात सहभागी होऊन पुस्तक वाचनाचा आनंद घेता यावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेतर्फे  दुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक चांदज व बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयास  111 पुस्तकांची 'आनंदी वाचन पेटी' भेट देण्यात आली. अध्यक्षीय समारोप करताना प्राथमिक उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे म्हणाले की, बोरीचे जैन वाचनालय हे ग्रामीण भागातील एक उत्कृष्ट वाचनालय असून बालवाचकांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांना वाचण्याची गोडी लागावी, यासाठी सतत प्रयत्न केले जातात. बाल वाचकांनी मोबाईलला दूर सारून पुस्तकांना आपलंसं केलं पाहिजे, त्यांना वाचले पाहिजे. यामुळे ज्ञानात निश्चित भर पडते. डॉ पवन चांडक यांनी या वाचनालयास दिलेल्या 111 उत्कृष्ट पुस्तकांचे सर्वांनी वाचन करा. जे बालवाचक हे 111 पुस्तके वाचतील त्या सर्व वाचकांना प्रत्येकी 101 रुपयाचे बक्षीस त्यांनी यावेळी जाहीर केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी केले.

# रामनवमी निमित्त चार दिवसांसाठी श्रीसाईबाबा मंदिर परिसर 'नो पार्किंग झोन'

## जिल्हा पोलीस अधीक्षकांचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** श्रीसाईबाबा मंदीरात होणाऱ्या रामनवमी उत्सवाच्या निमित्ताने शिर्डी येथे वाहनांची गर्दी आटोक्यात आणण्यासाठी श्री.साईबाबा मंदीर परिसर 'नो पॉकिंग झोन (वाहन विरहित क्षेत्र)' जाहीर करण्यात आला आहे. मंदीराकडे जाणाऱ्या पाच मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. १६ एप्रिल रोजी सकाळी सहा वाजेपासून ते १८ एप्रिल रोजी रात्री ११ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहणार आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी आदेश जारी केले आहेत.  आदेशानुसार श्री साईबाबा मंदिर चावडीचे पुर्वेकडील कॉर्नर ते राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी म.सा चौक - गुरुस्थान चौक व साईबाबा मंदिरगेट नंबर ४ पर्यंतचा पालखी मार्ग (२) श्री साईबाबा मंदिर गेट नं. ४ ते  गंगवाल प्रसाद दुकान इमारत पर्यंतचा पालखी



मार्ग. (३)श्री साईबाबा मंदिर गेट नं ४ ते साई तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र पर्यंतचा मार्ग (४) श्री साईबाबा मंदिर पुर्व बाजुकडील श्री साईबाबा चावडी ते श्री साईबाबा मंदिर गेट नं. ३ ते जुना पिंपळवाडी रोड पावेतो (साईउद्यान पर्यंतचा मार्ग) *(५)* जुना पिंपळवाडी रोड (श्री साईबाबा मंदिर गेट क्रमांक १ ते साई उद्यान साईश कॉर्नर पर्यंतचा मार्ग या रस्त्यावर येणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली आहे. शिर्डी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे धार्मिक स्थळ असून श्री. साईबाबांच्या दर्शनासाठी महाराष्ट्र,  परराज्य व  बाहेरील देशातून भाविकांची व त्यांच्या वाहनांची प्रचंड गदी होत असते.  दरवर्षी प्रमाणे यावर्षी रामनवमी उत्सव २०२४ साठी मोठ्या प्रमाणात भाविक श्री.साईबाबांच्या दर्शनासाठी येणार आहेत. अहमदनगर - मनमाड हा महामार्ग शिर्डी शहरातून जात असल्याने गर्दीच्या कालावधीत भाविकांची व जनतेची गैरसोय होवू नये तसेच भाविकांची सुरक्षितता व कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने श्री साईबाबा मंदिर परिसरात वाहन विरहीत क्षेत्र (नो पार्कंग झोन) घोषित करण्यात आला आहे.

# तोपर्यंत या देशाला हुकूमशाहीचा धोका आहे

## कॉ. डॉ. भारत पाटणकर : पाडेगावच्या जयंती महोत्सवातून शेतकरी, कामगारांची मांडली व्यथा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ब्रिटिशांचा घालविण्याचं, स्वातंत्र्याच स्वप्न आपण पाहिलं. पण हे स्वप्न पाहत असताना आपण काय मिळवलं. तर आपण "एक व्यक्ती, एक मत'ही समता मिळविली. टाटाला एक मत, टाटाच्या कारखान्यात काम करणाऱ्या माणसाला एक मत, पुरुषाला एकच मत, स्त्रीला एकच मत, जमिनीदाराला एकच मत, शेतमजुराला एकच मत ही समता आपण मिळविली. परंतु सामाजिक आणि आर्थिक समता आपण मिळवू शकलो नाही.सामाजिक आणि आर्थिक विषमता आपण जोपर्यंत मिळवू शकत नाही. तोपर्यंत या देशाला हुकूमशाहीचा धोका आहे.

असे प्रतिपादन श्रमिक मुक्ती दलाचे प्रमुख व पुरोगामी विचारवंत कॉ.डॉ.भारत पाटणकर यांनी केले. पाडेगाव, ता.फलटण येथे पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन यांच्या वतीने महापुरुष जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कॉ.डॉ. भारत पाटणकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. कॉ.डॉ.भारत पाटणकर हे वयाच्या ७५ व्या वर्षात पदर्पण करत असल्याने त्यांना घोंगडी,काठी आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी विद्रोही कवी व दंगलकार नितीन चंदनशिवे आणि विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे गौतम काटकर, पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशचे संस्थापक गिरिश बनकर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना सन्मानित करण्यात आले.कॉम्रेड साहेब तुमच्या "संघर्षाची गॅरंटी" महाराष्ट्र जाणतोय असे वर्णन त्या सन्मानपत्रात करण्यात आले.कार्यक्रम सुरू



करण्यापूर्वी क्रांतिची मशाल पेटविण्यात आली. तसेच महामानवाच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. कॉ. डॉ. भारत पाटणकर पुढे म्हणाले की, हुकूमशाहीचा धोका आपल्या देशाला आहे की नाही हे आपल्याला सांगण्याची गरज नाही.

हुकूमशाही दिल्लीला नाही ती गावा गावात,जिल्ह्या जिल्ह्यात, शहरा शहरामध्ये आहे.ती काय दिल्लीला बसलेली नाही. जे फक्त दिल्लीला जे हुकूमशाही बघतील ते हुकूमशाहीचा पराभव करू शकणार नाहीत. तात्पुरता करू शकतील.पुर्णपणे करू शकणार नाही. हुकूमशाहीची लोकशाही कधी होईल आपण जे सगळे लोकं आलेले न आलेले आहोत. यांच्या घरामध्ये जोपर्यंत स्वातंत्र्य ज्यावेळी येईल, समाधान सुख येईल, कुठेही अशी विषमता दिसणार नाही उच्च निच्चता दिसणार नाही.

त्यावेळी स्वातंत्र्य येणार आहे. त्यावेळी आपल्या महामानवाचं स्वप्न येणार आहे. कॉ.डॉ.भारत पाटणकर म्हणाले की ,महात्मा फुलेंनी आपल्याला सांगितलं की हे जातीचं भूत आपल्याला संपविले पाहिजे.त्या शिवाय आपली सुटका नाही.आपल्यात जातीयतेची फूट कशी आहे हे आपल्याला बाबासाहेबांनी कसे सांगितले तर आपल्यात कधीच एकी राहणार नाही.अशा प्रकारची कसबानी केलेली आहे.हे कशा प्रकारचे कसब वापरले आहे.मी अमक्या जातीची व्यक्ती आहे.ती दुसऱ्या जातीची व्यक्ती आहे.आम्ही कधीच एकत्र येऊ शकत नाही. ज्या जातींचं शोषण होतं.त्या जाती सुद्धा एकत्र येऊ शकत नाही.त्यातली सगळ्यात खालची समजली जाणारी ती जात सुद्धा मी कुणाच्या तरी वरची आहे.त्या जातीतले आम्ही आहोत असे म्हणतात. पूर्वाश्रमीचे जे महार समजले जात होते.आज ते बौद्ध आहेत.बौद्ध झालेले लोक सुद्धा अंतर्गत जात पाळतो. मी बौद्ध झालेला माणूस आहे.पण मी जात पाळत नाही. परंतु पोट जाती पाळूनच लग्न आज बौद्ध झालेल्या लोकांच्या मध्ये होतात.पुर्वाश्रमीच्या अस्पृश्य जाती एकमेकिला एकमेकापाशी श्रेष्ठ समजत असतात.आजही समजतात.हे जोपर्यंत आहे तोपर्यंत आपल्या डोक्याच्या वर जे बसलेले आहेत,ज्यांचा फायदा आपल्यातल्या फुटीमुळे होणार आहे.ते आपल्यावर राज्य करू शकणार आहेत.ते आपलं शोषण करू शकणार आहेत.त्यांची एकजुट राहील.हे बाबासाहेबांनी त्यावेळी सांगितलं.असे सुद्धा कॉ.डॉ.भारत पाटणकर म्हणाले.यावेळी दंगलकार नितीन चंदनशिवे यांनी त्यांच्या खास शैलीतून कविततेचे सादरीकरण केले.तसेच चळवळीतील कार्यकर्त्यांच्या परिस्थितीवर विशेष प्रकाशझोत टाकला."आमचा कांबळे"ही कविता तर सादर करत असताना उपस्थितांना हसविले.मी धर्माला थुका आणि जातीला चुना लावला आणि मी माणूस झालो ही "माणूस" नावाच्या कवितेवर विशेष टाळ्यांची दाद मिळाली.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरीश बनकर यांनी केले.यावेळी कार्यक्रमास महिला पुरुष आणि चिमुकल्यांची विशेष दाद मिळाली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

**'ताव मारला त्यांच्या कडे सत्तर टक्के :** संपत्ती जर आपण, तुम्ही पुन्हा स्वप्न पाहायला शिकलो नाही तर आजचा काळ फार कठीण आहे .आताच्या काळामध्ये जर आजची तरुण पिढी स्वप्न पाहायची बंद झालेली असेल किंवा ती स्वप्न पाहायला शिकणार नसेल तर देशाचे सत्तर टक्के संपत्ती ही अदानी, अंबानी, मिट्टल किर्लोस्कर, टाटा यांच्या ताब्यात गेलेली आहे .तुमच्या आमच्या शेतकऱ्याच्या पोटी जन्माला येऊन ही शेतीत भागत नाही म्हणून जे कामगार झाले .त्या सगळ्यांच्या हातांमध्ये ३० टक्के संपत्ती आहे .आपल्या समोर कुठलेही शासन येवो, काहीही होवोत, तर आपण कोण आहोत ? तर आपण भिक्षेकरी आहोत .तुम्हाला आम्ही हे दिलं, ते दिलं, जो शेतकरी, जो कामगार या जगाला निर्माण करतो .हे कोणी टाटा, अदानीने निर्माण केलेलं नाही . ज्यानं निर्माण केलं त्याच्या कडे तीस टक्के संपत्ती आहे .ज्याने त्याच्या वर ताव मारला त्यांच्या कडे सत्तर टक्के संपत्ती आहे .हा जो प्रकार आहे .तो आजपर्यंत कधीही न घडलेला प्रकार आहे, असे – कॉ .डॉ .भारत पाटणकर यांनी म्हटले आहे .

## भीमजयंतीनिमित्त व्हीबीए व भीमज्वाला मित्र मंडळ धामणगाव येथे मोफत आरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दिनांक १३ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत धामणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोफत भव्य आरोग्य निदान शिबिर आयोजित करण्यात असून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर व औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष योगेश गुलाबराव बन यांच्या मार्गदर्शनात वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद व भीम ज्वाला मित्र मंडळ धामणगाव व वाळूज हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत योजना मोफत भव्य आरोग्य निदान शिबिर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ वी जयंती निमित्त आयोजित करण्यात आले. या शिबिरात आलेल्या १२० रुग्णांना विविध आजारावर उपचार करून मोफत गोळ्या व औषधी देण्यात आले. यावेळी वाळूज हॉस्पिटलचे अधिकारी व कर्मचारी डॉ. किरण कीर्ती शाही, डॉ. प्रतिभा वाघ, डॉ. वर्षा पगारे, डॉ. विकास रणशूर, जनसंपर्क अधिकारी कृष्णा बडघे, ॲम्बुलन्स ड्रायव्हर विलास कोतकर,व सामाजिक कार्यकर्त्या सारिका कोतकर, तालुकाध्यक्ष मुक्तार भाई सय्यद, ता. महासचिव राजाराम घुसाळे, ता. संपर्कप्रमुख अकबर शेख, किरण बनकर, हार्तिक गरुड, राजु कोतकर, शरद कोतकर, कचरू श्रीखंडे, बाळु विधाटे व सर्व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व भीम ज्वाला मित्र मंडळ धामणगाव यांनी वाळूज हॉस्पिटलचे अधिकारी व कर्मचारी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन त्यांचे सत्कार व आभार व्यक्त करण्यात आले. व इतर परिसरातील शिबिरात आलेले रुग्ण व गावकरी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## महामानवांच्या जयंतीनिमित्त सरबत वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या गोहोगाव हाडे येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त लोकसेवा राष्ट्रीय सांस्कृतिक नाट्य मंडळाच्या वतीने शरबत थंड पेय वाटप करून महामानवांची जयंती साजरी करण्यात आली आहे.

पारंपारिक लोककला टिकवून ठेवण्यासाठी झटणाऱ्या लोककलावंतांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी गोहोगाव येथील लोकसेवा राष्ट्रीय सांस्कृतिक नाट्य मंडळ ही संस्था वाशिम जिल्ह्यात अग्रेसर आहे. लोककलावंतांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन दरबारी आवाज उठवणारे संस्थेचे अध्यक्ष रतन हाडे हे नेहमीच राष्ट्रीय कार्यक्रमानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करत असतात. नुकतेच त्यांनी गोहोगाव हाडे येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली आहे. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव शे. ईनुस शे.निजाम हे होते. यावेळी महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. दरम्यान कार्यक्रमास उपस्थित जनसमुदायास शरबत थंड पेय वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष रतन हाडे यांनी महामानवांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून त्यांचे विचार सर्वांनी अंगिकारावे असे आवाहन केले. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या शेकडो ग्रामस्थांचे आभार शे. इनुस यांनी मानले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# गांजाची तस्करी करणारे आरोपी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बल्लारपुर येथून तेलंगाणा येथे रेल्वेनी अंमली पदार्थ (गांजा) वाहतुक करित असताना गांजासाठा जप्त केले असून तीन आरोपींना अटक केले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीचा पाश्वभुमीवर आदर्श आचार संहिता सुरु असतांना अवैधरीत्या अंमली पदार्थ (गांजा) बल्लारपुर येथुन तेलंगाणा येथे रेल्वेनी जाणार असतांना रेल्वे स्टेशन बल्लारपुर येथिल एस.एस.टी. पाईंट वरील चेकींग कर्मचारी यांनी झडती केली असता दरम्यान बल्लारपुर पोलीसांना १३ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता चे कारवाई केली असता ९३९ ग्रॅम अंमली पदार्थ (गांजा) व गांजा नेण्यासाठी उपयोगात आणलेल्या दोन स्कुल बॅग असा एकूण ९ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल मिळून आला असून आरोपी राजेश नायक बाबुराव घुगलोत (२९) रा. रामगुंडम जिल्हा-करिमनगर, वामशी अवनीधर गाजुला (२२) रा. हॉयटेक सिटी रोड नं.२ मंचेरियल जिल्हा-मंचेरियल राज्य- तेलंगाणा, अरबाज शफी खान (२३) रा. तिलक वार्ड बल्लारपुर जि. चंद्रपुर यांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणे बल्लारपुर येथे गुन्हा रजि. क्रं.३८०/२०२४ कलम-८ (क), २०(ब), (II)



(अ), २१ एन.डी.पि.एस. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु, दिपक साखरे उपविभागीय पोलीस अधिकारी, राजुरा यांचे मार्गदर्शनात पो.नि. आसिफराजा बी. शेख, स.पो.नि. दिपक कांक्रेडचार, सफौ गजानन डोहीफोडे, पोहवा. रणविजय ठाकुर, आंनद परचाके, बाबा नैताम, संतोष दंडेवार, पो.अं. शेखर माथ हूनकर, वशिष्ठ रंगारी, शरदचंद्र कारुष, लखन चव्हाण व एस.एस. टी. पाईट वरील पोअं. दयाल कुकुडकर व महसुल स्टॉफ यांनी केली आहे.

# सर्व्हरच्या खोड्याने अद्यापही दुष्काळी अनुदानाची शेतकऱ्यांना प्रतीक्षाच

## अनेक गावातील नुकसान भरपाई याद्याच अपूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील बऱ्याच गावामधील अनेक शेतकरी अद्यापही दुष्काळी अनुदानाच्या रकमे पासून वंचित असल्याचे चित्र रिसोड तालुक्यात पहावयास मिळत आहे. या वर्षी शेतकऱ्यांना खरीप हंगामी सोयाबीन तूर पिकांची पेरणी झाल्यापासून अनेक नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागला त्याचा एकंदरीत परिणाम असा झाला की सोयाबीन चा उत्पादन खर्च वसुलापेक्षा फारसे शेतकऱ्यांच्या पदरी काही पडले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची सर्व भिस्त ही दुसरे मुख्य पीक असलेल्या तुर पिकाकडे होती. पीक ही चांगल्या अवस्थेत होते. परंतु पुन्हा नैसर्गिक संकटाची अवकळा आली आणि ऐन तूर पीक काढणीच्या वेळी आलेल्या पाऊसाने तूर पिक होत्याचे नव्हते झाले. एकरी एक पोत्याचा उतारा आला. सोयाबीन तूर पिकांची नुकसान भरपाई मिळण्यासाठी अनेक संघटना,पक्ष यांनी शासन दरबारी मागणी केली. याचे फलित म्हणून शासनाने शेतकऱ्यांना भरीव मदत केली खरी पण ही मदत सर्वरच्या अडचणीमुळे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास अडचणी निर्माण होत आहेत.त्यातच तालुक्यातील अनेक गावामधील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई याद्या अद्यापही तहसील मध्ये जमा न झाल्याने शेतकऱ्यांना विशिष्ठ क्रमांक यादी मिळेना त्याचाच एक भाग म्हणून लोणी खुर्द हे गाव आहे. या गावातील पहिल्या गाडीमध्ये जवळपास 80 शेतकऱ्याचे विशिष्ठ क्रमांक तयार झाले त्यांची ई के वाय सी होऊन अनुदान ही खात्यात जमा झाले. परंतु त्या नंतर संबंधित कर्मचारी हे निवडणूक कामात व्यस्त असल्याचे कारण दाखवत अड्यपही त्यांनी दुसरी यादी तहसील कार्यालयात दिली नसल्याने शेतकरी हकाच्या दुष्काळी निधी पासून वंचित आहेत.त्यामुळे इ-केवायसी करण्यापासून वंचित असलेल्या उर्वरित शेतकऱ्यांमध्ये अनुदान मिळणार की नाही याबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. त्यातच महाराष्ट्र शासनाची मदत व पुनर्वसन विभागाचे अनुदान वितरण प्रणाली पोर्टल तात्पुरते बंद असल्याने शेतकऱ्यांना मिळत असलेल्या नुकसान भरपाईच्या कामात तांत्रिक व कृत्रिम अडचणी निर्माण होत आहेत. तरी याकडे मा.जिल्हाधिकारी महोदयांनी लक्ष देऊन तालुक्यातील प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्यांची मदत त्यांच्या खात्यात जमा करण्याचे तातडीचे आदेश देऊन सदरचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी तालुक्यातील शेतकरी वर्गातून होत आहे.

# 'विद्यापीठ आपल्या गावात'ची सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** अत्यंत गरिबी आणि संधीचा अभाव यामुळे पदवी प्राप्त करण्याचे स्वप्न अपूर्ण राहिलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांसाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा "विद्यापीठ आपल्या गावात" हा उपक्रम राबविल्या जात आहे. या उपक्रमाचे उद्घाटन वरोरा तालुक्यातील खेमजई या गावात करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा आदर्श पदवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आमुदाला चंद्रमौली यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रंजना लाड, सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रवीण मुधोळकर, आदर्श पदवी महाविद्यालयाचे समन्वयक भरत घेर, गुरुदास आडे, सामाजिक कार्यकर्ता डॉ. प्रमोद गंपावार, खेमजई ग्रामपंचायतच्या सरपंचा सौ. मनीषा चौधरी तसेच नागरीक उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना डॉ. चंद्रमौली म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातंर्गत सुरू केलेला हा अभिनव अभ्यासक्रम पुस्तकी शिक्षणाचा अतिरेक टाळून यामध्ये कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य, उद्योगाच्या संधी याबाबतच्या ज्ञानासोबत पदवी प्राप्त होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांनी या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रंजना लाड यांनी खेमजई गावाचे आनंद निकेतन महाविद्यालयाशी असलेले ऋणानुबंध आणि शिबिरांमध्ये मिळालेले सहकार्य याचा विशेषत्वाने उल्लेख केला. आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांनी ग्रामीण भागातील पदवी शिक्षणाच्या कमतरतेवर चिंता व्यक्त करत विद्यापीठाच्या या नाविण्यपुर्ण उपक्रमामुळे शिक्षण प्रक्रिया गतीमान होईल आणि शिक्षणाची उणीव भरून निघेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त केला. तसेच संध्याकाळी 6 ते 9 या कालावधीत सदर वर्ग घेण्यात येईल अशी माहिती त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. डॉ. प्रवीण मुधोळकर यांच्याद्वारे ग्रामीण विकास या विषयावर माहिती देऊन या अभ्यासक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत घेर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन रमेश चौधरी यांनी तर आभार बी.ए अभ्यासक्रमाचा विद्यार्थी सुधीर नन्नावरे यांनी मानले. तत्पूर्वी, कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाला अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# माळीवाडा येथे महादेव व भगवान कानिफनाथ यात्रा उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**माळीवाडा :** माळीवाडा येथे गुडीपाडव्याचा तिसऱ्या दिवशी महादेव कानिफनाथ महाराज यात्राची २०२ वर्षापूर्वीची परंपरा असलेल्या महादेव व कानिफनाथ महाराज यात्रा मोठ्या उत्साहात साजरी झाली. गुडीपाडव्याच्या वर्षे प्रतिपदेस सकाळी महादेवाचा मंदिरात पुजा करुन मंदिरा समोर महाल बसाविण्यात येतो. ३० फुट उंचीचा बाबूस (काठी)सजवुन महादेव समोर महादेवाची पितळी प्रतिमा ठेवण्यात येते. भक्त मोठ्या श्रध्देने पुजा करतात व संध्याकाळी अंबिलच्या घागरी आणून त्याची पूजा केली जाते. त्यानंतर घागरीतुन आणलेले (दुधाच्या ताकापासुन बनविलेले) अंबिल भक्ताना प्रसाद म्हणून वाटण्यात येते.

महादेवाचा यात्रा गुडीपाडव्याचा तिसऱ्या दिवशी गुरूवारी दि.११ वाजता सकाळी गावातील मानाचे गावकरी महादेवाच्या काठीला नऊ घडीचे बाशिंग व नाग फणाचे बाशिंग बनवतात.

महादेव कानिफनाथ महाराज यात्रा रात्री १२ वाजेपासुन सुरू होऊन ढफ, वाजत गाजत गावातुन मिरवून शंक नाद हर हर महादेव गर्जनाने सर्व परिसर भक्तीम होतो.फट्याक्याची आतिष बाजी,भक्त मंडळी काठीवर रेवड्या फेकून नवस फेडतात महादेव व कानिफनाथ काठी गावातील वेशी बाहेर येऊन महाल उभे करतात.

काटेरी फास (फुले) अगोदरच वेशी बाहेर सात उनगे लाईनमध्ये आणुन ठेवतात व काट्याची पुजा केली जाते. नंतर काटेरी फास उभे केले जाते

गावातील वेशीत हे (काठ्या) महाल उभे करातात,मुख्य महालापासुन सुमारे १०० फुटाच्या अंतारावर फास (काट्या) उभा ईचक्याचा (काठ्या) आधारावर भक्त तोलुन धरतात,काटेरी फासावरा उडी घेणारे भक्त गण प्रथम वाजत गाजत काटेरी (फुले) फासाचे दर्शन घेतात,महालाच्या मागे जाऊन उभे राहतात. भक्तगण काटेरी फुलावर हरबोला हरबोला हरहर महादेव घोषणा देत पळत जाऊन उड्या मारतात.

या वर्षी १२ भक्तानी काटेरी (फुले) उड्या मारल्या खालील भक्त कोडिराम पल्हाळ, विनायक पल्हाळ,सोमनाथ मुळे, गोरख हेकडे, दादाराव पल्हाळ,राम विटोरे, सोमनाथ पल्हाळ, सोमनाथ जाधव, शाईनाथ रमेश पल्हाळ,रविंद्र वावरे, दिलीप काळे, आण्णा, संजय वावरे, यात्रा सकाळी ४.३० वाजता काटेरी फास जाळुन यात्रेची समाप्ती झाली. नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.महिला ची संख्या जास्त होती. या वर्षी व्हिडिओ कॅमेराद्वारे थेट दोन मोठ्या स्क्रीन वर दाखविण्यात आले यामुळे कोणत्याही प्रकारची गडबड, गोंधळ न होता व्यवस्थित पार पडली यात्रेसाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.







# सावंगी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील राजवाड्यांत महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमित्त ध्वजारोहणा नंतर अभिवादन करण्यात आले. प्रथमता राजवाड्यांत ध्वाजारोहण तथा महानिर्वाण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मा सरपंच आप्पाराव पाटील नलावडे यांनी अभिवादन केले. तर पदाधिकारी व मान्यवरांचे पुष्प व रुमाल देवून सत्कार करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकून ते अंगकारावे असे आवाहन करण्यात आले. भक्तगित व विविध गिते सादर करण्यात आले. अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या आठवणी सांगितल्या. यावेळी सरपंच आप्पाराव पाटील नलावडे, जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा, माजी सरपंच भिमराव नलावडे, सोसायटी संचालक ज्ञानेश्वर टेलर, प्रकाश नलावडे, प्रभाकर शिंदे, ग्राविअ बनसोड, जमादार विनोद बिघोत व्यासपीठावर उपस्थित होते.

तर पोलीस पाटील के एन नरवडे, सय्यद टेलर, चांद पठाण, सराटे, गवळी, जनार्दन औटे, भिकन दादा, सुधाकर औटे, जाधव, मिलिंद नरवडे, कारभारी नरवडे, बाबासाहेब खरात, किरण दिवेकर, करण ढिवर, विक्की जाधव, अजय नरवडे, सागर नरवडे सह महिला, मुले, मुली, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# पैठण येथे रॅली काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** शहरातील श्रावस्ती बुद्धविहार पावर हाऊस येथुन दि. १४ एप्रिल रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त महिला, पुरुषानी भव्य अभिवादन रॅली काढण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भन्ते आनंद यांनी त्रिशरण पंचशील ग्रहण केले. भंते आनंद यांनी पैठण येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उपस्थिताना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकर. यांच्य जयंती निमित्त उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, तहसीलदार सारंग चव्हाण, माजी राज्यमंत्री अनिल पटेल, माजी आमदार संजय वाघचौरे, माजी सभापती विलास भुमरे, माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, सूरज लोळगे, शहराध्यक्ष निमेश पटेल, युनुस पठाण, श्रीमती छाया अशोक गायकवाड, लक्ष्मण औटे, रेखाताई कुलकर्णी, बंडु आंधळे, अशिष मापारी, राष्ट्रवादीचे जितु परदेशी, गणेश पवार, छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष किशोर सदावर्ते, साईनाथ कर्डिले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाबा आडसुळ, डॉ. पंडित किल्लारीकर, अरुण बल्लाळ, गौतम बनकर, स्वप्नील साळवे, रावसाहेब दादा आडसुळ, विनोद सरोदे, राजेंद्र उगले, जितेंद्र आटक, सुमित मगरे, रवींद्र गायकवाड ॲड. सरोदे, कपिल पहिलवान, महेंद्र साळवे,अशोक पगारे, चंद्रकांत पगारे, अशोक मगरे यांच्यासह हजारो समाज बांधवांनी अभिवादन केले.

# घोडेगावात डॉ. आंबेडकर आंबेडकर जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव येथील महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. दिनांक १४ रोजी राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय, स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय घोडेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले .यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.साईनाथ पा जाधव साहेब,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी संदिप जाधव सर,प्राचार्य डी.डी. घुगे सर, प्रा. टी. एल. जाधव सर, प्रा.नलावडे सर, प्रा.अमोल जाधव सर, सोनवणे सर, श्रीखंडे मामा, व्यवहारे मावशी व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थिती होते.



# रामायणाचार्य हभप ढोक महाराजांच्या तुलसी रामायण कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर चारी क्रमांक तीन जवळ असलेल्या रामनगर येथील श्रीराम साधना आश्रमामध्ये महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विदर्भ रत्न रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक यांच्या संगीतमय तुलसी रामायण कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कथा प्रसंगी होणाऱ्या रामनामाच्या जयघोषाने परिसर दुमदुमला असून वातावरण राममय बनले आहे. श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने रामायणाचार्य हभप रामरावजी महाराज ढोक यांच्या सुश्राव्य वाणीतून ही कथा दि.११ ते १८ एप्रिल या कालावधीत सायंकाळी ७ ते १० यावेळेत होत आहे. या सोहळयाच्या निमित्ताने दि.११ ते दि.१७ एप्रिल या कालावधीत सकाळी १० ते १२ यावेळेत किर्तन महोत्सव होत आहे.महोत्सवात हभप दयानंद महाराज कोरेगावकर, देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज, बीड येथील हभप श्री अमृताश्रम स्वामी महाराज यांनी भेटी देऊन किर्तन सेवा दिली आहे.

बीड येथील महादेव महाराज राऊत, सावखेडा येथील गिरी आश्रमाचे महंत श्री कैलासगिरीजी महाराज, पैठण येथील भागवताचार्य साध्वी सुवर्णानंद चैतन्य,दि.१७ एप्रिल रोजी रामनवमी निमित्त महंत परमहंस मुक्तानंद महाराज वेल्हाळे संगमनेर यांचे किर्तन होणार असून दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी करून श्री रामजन्मोत्सव साजरा होणार आहे. रामायाचार्य हभप रामराव महाराज ढोक यांच्या संगीतमय रामकथेने भाविक मंत्रमुग्ध होत आहे,कथा समारोप प्रसंगी सेवेकरी दाम्पत्याच्या हस्ते रात्री महाआरतीने येथील परिसर रामनामाच्या धूनने राममय झालेला दिसत आहे.त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचे शिक्षक प्रा.अशोक गाडे सर यांच्या बहारदार शैलीतील निवेदन ही सर्वांना आकर्षित





करत आहे. गुरुवार दि.१८ एप्रिल रोजी हभप पांडुरंग गिरी महाराज वावीकर यांच्या होणाऱ्या काल्याच्या किर्तनाने आठ दिवस चालणाऱ्या श्री रामजन्मोत्सव व किर्तन महोत्सवाची सांगता होणार आहे.दुपारी ३ वाजता त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचे संस्थापक मेजर साहेबराव घाडगे पाटील यांच्या सौजन्याने कुस्त्यांचा जंगी होणार आहे

श्रीरामजन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित संगीतमय तुलसी रामायण कथा व होणाऱ्या किर्तन महोत्सवात होणाऱ्या किर्तन श्रवणाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी केले आहे.

# पावसाने माघार घेताच उकाड्यात प्रचंड वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मागील संपूर्ण आठवड्यात वादळीवारा आणि गारपिटसह झालेल्या पावसाने विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात शेतपिकांचे आणि फळ बागांचे मोठे नुकसान केले. दरम्यान, या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरीही तो तेव्हढ्यापुरताच होता. राज्याच्या अनेक भागातून पावसाने माघार घेताच उकाड्यात प्रचंड वाढ झाली आहे. रविवार १४ एप्रिलला तापमानात वाढ नोंदवली गेली तर उकाडा देखील प्रचंड वाढला. येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होणार असून उकड्यातही वाढ होईल असे संकेत हवामान खात्याने दिले आहेत. अवकाळी पाऊस येण्यापूर्वी विदर्भात सर्वोच्च तापमानाची नोंद झाली होती. विदर्भातील तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक नोंदवला गेला. अवकाळी पावसामुळे तो खाली आला होता. ४० अंश सेल्सिअसपेक्षाही तो कमी नोंदवला गेला. मात्र, आता हवामान खात्याने येत्या काही दिवसांत तापमानात मोठी वाढ होईल असा इशारा दिला आहे. विदर्भासह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा तसेच मुंबईत देखील ही तापमानवाढ होऊ शकते.

